साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..




संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कम्पाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १६.०७.२०२६ | अंक नं. ०९१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चांदीमधील चेन, ब्रासलेट, अंगठी, पेंडन्टच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १९९/-*
Conditions Apply


## 'जुन्या कलेक्टर ऑफिस रस्त्याची' दुरावस्था; खड्ड्यांमुळे होताहेत अपघात; मनपाचे दुर्लक्ष

नगर - नगर शहरातील महत्त्वाचा आणि गजबजलेला मार्ग असलेल्या चांदणी चौक ते जुन्या कलेक्टर कचेरी रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली आहे. या मार्गावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून, प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराविषयी नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठत आहे. थोडा जरी पाऊस झाला, तरी संपूर्ण रस्ता पाण्याखाली जात असल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे ठप्प होतो. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दररोज अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, अनेक पादचारी व दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत. या धोकादायक मार्गावरून नोकरदार वर्ग, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी रोज ये-जा करतात. रस्ता बंद पडल्यास किंवा पाणी साठल्यास या सर्वांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून त्यांची गैरसोय होत आहे.

### शासकीय कार्यालये असूनही दुर्लक्ष

जरी नगरचे मुख्य जिल्हाधिकारी कार्यालय (कलेक्टर ऑफिस) नगर-औरंगाबाद रस्त्यावरील नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित झाले असले, तरीही जुन्या इमारतीचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. या आवारात आजही प्रांत कार्यालय, दस्त नोंदणी कार्यालय (रजिस्ट्री ऑफिस) आणि पुरवठा विभागाची महत्त्वाची कार्यालये कार्यरत आहेत. त्यामुळे दररोज हजारो नागरिक आपल्या शासकीय कामांसाठी याच रस्त्याचा वापर करतात. इतकी महत्त्वाची कार्यालये असूनही प्रशासनाने या रस्त्याकडे पाठ फिरवली आहे.

### नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी यासाठी अनेक सामाजिक संघटनांच्या वतीने महानगरपालिकेला वेळोवेळी निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, महानगरपालिका प्रशासनाने या जनभावनेची दखल न घेता जाणीवपूर्वक या समस्येकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप संतप्त नागरिकांनी केला आहे.ऐन पावसाळ्यात नागरिकांना होणारा हा त्रास आणि वाढते अपघात पाहता, महानगरपालिका प्रशासनाने आता तरी सुस्त निद्रेतून जागे व्हावे आणि कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी चांदणी चौक ते जुने कलेक्टर ऑफिस या रस्त्याची युद्धपातळीवर दुरुस्ती करावी, अशी आग्रही मागणी नागरिकांकडून केली जात आहे.


शहरातील चांदणी चौक ते जुने कलेक्टर ऑफिस या रस्त्याची झालेली दुर्दशा. (छाया : लोकेश बर्वे)


गंज बाजार, सराफ बाजार परिसरातील अतिक्रमण धारकांवर कठोर कारवाई करावी या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत आयुक्त डांगे यांना देताना संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोळगे, समवेत अमोल गाडे, नगरसेवक सुरेश बनसोडे, गोविंद धावडे, प्रमोद बुऱ्हाडे, संजोग मुथ्था, आनंद मुथ्था, समीर मुथ्था, नितीन सोनवणे, नितीन सोनी सह संघटनेचे पदाधिकारी (छाया - धनेश कटारिया)

## बाजारपेठेतील अतिक्रमणधारकांवर कारवाई करून गुन्हे दाखल करणार

**सराफ सुवर्णकार व्यापारी संघटनेच्या शिष्टमंडळाला आयुक्तांचे आश्वासन; आ.संग्राम जगताप यांच्यासमवेत दिले निवेदन**

नगर - शहरातील गंज बाजार, सराफ बाजार परिसरातील अतिक्रमण काढण्यात यावे आणि अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच विकासात्मक आराखड्याची अंमलबजावणी करून दीर्घकालीन शाश्वत व कायदेशीर समाधान आणावे अशी मागणी सराफ सुवर्णकार व्यापारी संघटना तथा गोल्ड ज्वेलर्स कौन्सिलच्यावतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत आयुक्त डांगे यांना संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी दिले. यावेळी अमोल गाडे, नगरसेवक सुरेश बनसोडे, गोविंद धावडे, प्रमोद बुऱ्हाडे, संजोग मुथ्था, आनंद मुथ्था, समीर मुथ्था, नितीन सोनवणे, नितीन सोनी सह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी आयुक्त डांगे म्हणाले, जर अतिक्रमण धारकांना महानगरपालिकेचे गांभीर्य नसेल आणि त्यांना अतिक्रमण करून नागरिकांना त्रास द्यायचा असेल तर महानगरपालिका कडक कारवाई करणार व त्यांच्यावर गुन्हेही दाखल करण्यात येतील. मी अनेक वेळा या बाजारातून फिरत असतो नागरिक त्यांची दुकाने आत रिकामी ठेवतात आणि रस्त्यावर त्यांचा सर्व पसारा मांडतात. त्यामुळे रस्त्यावर ये-जा करताना नागरिकांना अडथळा निर्माण होतो आणि बाजारात नागरिक त्यामुळे येत नाही. मी जातीने लक्ष घालून या अतिक्रमणधारकांवर कडक कारवाई करणार असून अतिक्रमणधारकांवर कारवाई केल्यावर त्यांचे जप्त केलेले साहित्य त्यांना यापुढे पुन्हा मिळणार नाही, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला.

आ. संग्राम जगताप म्हणाले व्यापाऱ्यांनी त्याच्यामुळे इतरांना त्रास होईल असे वागू नये. बाजारपेठेत रस्त्यावर अतिक्रमण करू नये. प्रशासनाला जर अतिक्रमण धारक अडथळा निर्माण करत असतील तर प्रशासनाने त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे व कठोर कारवाई करण्यात यावी.


नगर रोलिंग शटर
१) नवीन शटर मिळेल. २.जुने शटर रिपेरिंग व ग्रिसिंग केले जाईल
पत्ता- नगर अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर (लोंढे मळा)
7350682390


भावपूर्ण श्रद्धांजली..



जीवनात केले कष्ट अपार,
तुम्ही होता आम्हा सर्वांचे आधार ।
पाहिलेत तुम्ही स्वप्ने अपार,
करु आम्ही सर्व स्वप्ने साकार ।।

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!

**कै.सौ.लता ईश्वर पडोळे**
स्वर्गवास बुधवार दि. ०८/०७/२०२६

* दशक्रिया विधी *
शुक्रवार दि. १७/०७/२०२६ रोजी, सकाळी. ८.०० वा. स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे होईल.

* दुःखांकित *
श्री. नामदेव भाऊसाहेब पडोळे । श्री.ईश्वर विठ्ठल पडोळे
श्री. शंकर विठ्ठल पडोळे । श्री. आप्पासाहेब विठ्ठल पडोळे
श्री. बाळासाहेब नामदेव पडोळे । श्री. अतूल कैलास पडोळे
श्री. मयूर ईश्वर पडोळे । श्री. कुशल ईश्वर पडोळे

**समस्त पडोळे परिवार**


१७ जुलै
३६ वर्षे सेवा, विश्वास आणि गुणवत्तेची
आपणा सर्वांच्या विश्वासाच्या पाठबळांवरच आम्ही ३५ वर्षे पुर्ण करून ३६ व्या वर्षात पदार्पण
२५ कोटी ठेवीकडे वाटचाल...
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.
MIS योजना ९,२०,०००/- ठेव ठेवा व ९०००/- रु. प्रत्येक महिन्याला व्याज मिळवा...
मुदत ठेव योजना
१३ महिने ते २ वर्ष द.सा.द.शे. १०% | २५ महिने ते पुढे द.सा.द.शे. १०.५%
१० ग्रॅम सोनेतारणावर रु. ७०,०००/-
अल्पमुदत ठेव योजना - ४६ दिवस ते १ वर्षाच्या आत द.सा.द.शे. ९%
दामदुप्पट ठेव योजना ९० महिने | वाहन कर्ज योजना १५ % | सोनेतारण कर्ज सुविधा १२ %

| दरमहा भरावयाची रक्कम | मुदतीनंतर मिळणारी रक्कम १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष | ४ वर्ष | ५ वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| रूपये ५०० | ६३०० रू. | १३३२५ रू. | २१०५० रू. | २९६०० रू. | ३९०५० रू. |
| रूपये १००० | १२६०० रू. | २६६५० रू. | ४२१०० रू. | ६९२०० रू. | ७८१०० रू. |

लाभांष १२%
भागभांडवल २८.४३ लाख
ठेवी १५.१२ कोटी
श्री. रखमाजी निस्ताने चेअरमन/ संस्थापक
श्री. चंद्रकांत औशीकर व्हा. चेअरमन
संचालक मंडळ - श्री. सागर चवंडके, श्री. अनंता औशिकर, श्री. जगन्नाथ बहिरवाडे, श्री. अमोल निस्ताने, श्री. रोहिदास नामदे, सौ. उषाताई खताडे, श्रीमती जयश्री बिडकर, श्री. संतोष थिवर, ● श्री. शंकर मिसाळ (सेक्रेटरी) ● तज्ञ संचालक - श्री. सुभाष भागानगरे, श्री. होनजी गोडळकर ● तडजोड, गाऱ्हाणे आणि तक्रार निवारण समिती - सुभाष दारवेकर, गंगाधर सोनवणे
कर्मचारी वृंद - अजिंक्य कलागते, ऋषिकेश पासकंटी
Asha

# वारी पंढरपूरची

## विठ्ठलाशी हक्काने भांडणारा भक्त 'कर्ममेळा'



वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे सौंदर्य हे आहे की, इथे देवाला केवळ 'जगन्नियंता' मानून दूर ठेवले जात नाही, तर त्याला आई, बाप, सखा आणि प्रसंगी आपल्या घरातील हक्काचा माणूस मानले जाते. संत चोखामेळा यांनी समाजाचा छळ शांतपणे सोसला आणि विठ्ठलाला मायेने आळवले.

परंतु, त्यांचा मुलगा कर्ममेळा हा तत्कालीन सामाजिक विषमतेने, गरिबीने आणि अस्पृश्यतेच्या चटक्याने असा काही होरपळला होता की, त्याने थेट पांडुरंगाच्या न्यायबुद्धीलाच न्यायालयात उभे केले! देवा, तू जगाचा बाप आहेस ना, मग तुझ्याच राज्यात तुझ्या लेकरांच्या नशिबी हा विटाळ आणि ही उपेक्षा का? असा जळजळीत प्रश्न विचारणारे संत कर्ममेळा हे महाराष्ट्राच्या सामाजिक बंडखोरीचे आद्य प्रणेते आहेत.

संत कर्ममेळा यांचा जन्म १४ व्या शतकाच्या पूर्वार्धात सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे येथे झाला. वारकरी संप्रदायातील एका सर्वात मोठ्या 'संत कुटुंबात' त्यांचा जन्म झाला होता.

कर्ममेळा यांच्या घरातील प्रत्येक व्यक्ती विठ्ठलाच्या चरणी लीन झालेली होती.

वडील : संत शिरोमणी चोखामेळा, आई : संत सोयराबाई,
आत्या : संत निर्मळाबाई, मामा : संत बंका महार

अशा अत्यंत सात्विक, भक्तीने ओतप्रोत भरलेल्या पण दुसरीकडे गरिबी आणि सामाजिक छळाचा सामना करणाऱ्या कुटुंबात कर्ममेळा मोठे झाले. घरात अहोरात्र विठ्ठल नामाचा गजर चालायचा, संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांचे संस्कार त्यांच्यावर बालपणापासूनच झाले होते.

जरी कर्ममेळा यांच्या घरात भक्तीचे साम्राज्य असले, तरी वेशीबाहेरचे जग अत्यंत क्रूर होते. बालपणी कर्ममेळा यांनी पाहिले की, त्यांचे आई-वडील देवावर एवढे प्रेम करतात, तरीही गावातील उच्चवर्णीय लोक त्यांना मंदिरात जाऊ देत नाहीत. त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागते, रस्त्यावरून चालताना स्वतःच्या सावलीचाही विटाळ मानला जातो.

मंगळवेढ्यात वेशीच्या भिंतीचे काम करताना जेव्हा वडील चोखामेळा यांच्यावर भिंत कोसळली आणि त्यांचा अंत झाला, तेव्हा बाल कर्ममेळा यांचे मन प्रचंड विदीर्ण झाले. समाजाकडून मिळालेली ही उपेक्षा आणि गरिबी पाहून त्यांच्या मनात विठ्ठलाबद्दल एक हक्काचा राग निर्माण झाला. हा राग नास्तिकतेचा नव्हता, तर आपल्या लाडक्या बापाने (विठ्ठलाने) आपल्याला अशा दुःखात का ठेवले, याबद्दलचा आर्त टाहो होता.

संत कर्ममेळा यांचे अभंग हे मराठी संत साहित्यातील सामाजिक बंडखोरीचे पहिले पान मानले जाते. त्यांनी विठ्ठलाला 'तू' म्हणून संबोधले आहे आणि अगदी घरच्या माणसासारखे जाब विचारले आहेत.

कर्ममेळा देवाला विचारतात, देवा, तू एवढा चतुर आहेस, मग तू आम्हा गरिबांना अशा हीन जातीत का जन्माला घातलेस? तुला आमची दया येत नाही का?

एका अभंगात कर्ममेळा विठ्ठलाला अत्यंत कडक शब्दांत सुनावतात. ते म्हणतात, आम्ही रात्रंदिवस तुझे नाव घेतो, पण आम्हाला पोटभर अन्न मिळत नाही. उष्ट्या अन्नासाठी आम्हाला लोकांच्या दारात उभे राहावे लागते. देवा, तुझ्या भक्तांची अशी अवस्था पाहून तुला लाज कशी वाटत नाही?

जगातील कोणत्याही धर्मात देवाशी असा संवाद साधण्याची, त्याला असे प्रश्न विचारण्याची हिंमत फक्त आणि फक्त वारकरी संप्रदायातील संतांनीच दाखवली आहे. कर्ममेळा यांनी विठ्ठलाला केवळ सुखाचा देव मानले नाही, तर दुःखात पाठीशी राहणारा हक्काचा सखा मानले.

ज्याप्रमाणे पांडुरंगाने संत चोखोबा आणि सोयराबाई यांच्यासाठी अनेक चमत्कार घडवले, तसेच कौतुक विठ्ठलाने चोखोबांच्या या बंडखोर पुत्राचे, म्हणजेच कर्ममेळा यांचेही केले. कर्ममेळा जरी रागाने बोलत असले, तरी देवाला माहित होते की या मुलाच्या मनात माझ्याबद्दल अथांग प्रेम आहे.

वडील चोखामेळा यांच्या निधनानंतर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी तरुण कर्ममेळा यांच्यावर आली. त्यांनाही मंगळवेढ्यात कष्टाची आणि मजुरीची कामे करावी लागत असत. एकदा उन्हाळ्याच्या दिवसात कर्ममेळा शेतात जड लाकडे आणि दगड वाहण्याचे काम करत होते. ऊन प्रचंड होते आणि श्रमामुळे त्यांचे शरीर थकून गेले होते. तोंडातून विठ्ठलाचे नाव येत होते, पण शरीरात त्राण नव्हते.

अशा वेळी साक्षात पांडुरंग एका सामान्य मजुराचे रूप घेऊन तिथे प्रकट झाला. त्या मजुराने कर्ममेळा यांच्या हातातील जड ओझे स्वतःच्या डोक्यावर घेतले. कर्ममेळा यांना सावलीत बसवून देवाने स्वतः त्यांच्या शेतातील कामे पूर्ण केली. जेव्हा कर्ममेळा यांनी त्या मजुराच्या चेहऱ्यावरील तेज पाहिले आणि त्याच्या हातातील सुदर्शन चक्राच्या खुणा (शंख-चक्र) पाहिल्या, तेव्हा त्यांना समजले की हा दुसरा कोणी नसून माझा विठ्ठल माऊली आहे! कर्ममेळा देवाच्या गळ्यात पडून रडू लागले आणि म्हणाले, देवा, मी तुला एवढे वाईट-साईट बोलतो, तरी तू माझ्या कष्टासाठी धावून येतोस?

चोखोबांच्या निधनानंतर कर्ममेळा अत्यंत एकाकी झाले होते. एकदा संत नामदेव महाराज मंगळवेढ्याला कर्ममेळा यांना भेटायला आले. नामदेवांनी पाहिले की कर्ममेळा मंदिराजवळ न जाता दूर एका कोपऱ्यात बसून अश्रू ढाळत आहेत. नामदेवांनी विचारले, कर्ममेळा, तू विठ्ठलाला हाक का मारत नाहीस?

तेव्हा कर्ममेळा म्हणाले, माझ्या बापाला (चोखोबांना) ज्या समाजाने दारात उभे केले नाही, त्या देवाकडे मी काय मागू? नामदेव महाराजांनी कर्ममेळा यांना प्रेमाने जवळ घेतले आणि पांडुरंगाचा धावा केला. चमत्कार असा झाला की, पंढरपूरच्या देवळात उभा असलेला विठ्ठल साक्षात मंगळवेढ्याच्या त्या झोपडीत नामदेव आणि कर्ममेळा यांच्यासमोर प्रकट झाला! देवाने कर्ममेळा यांचे अश्रू स्वतःच्या पीतांबराने पुसले आणि सांगितले, बाळ कर्ममेळा, तुझे अभंग हे तुझे भांडण नाही, तर ते मला मिळवण्याची तुझी आर्त हाक आहे.

कर्ममेळा आपल्या प्रत्येक अभंगाच्या शेवटी अभिमानाने चोख्याचा कर्ममेळा असा उल्लेख करतात. आपल्या वडिलांच्या पवित्र आणि क्रांतिकारी नावाचा वारसा त्यांनी आयुष्यभर जपला.

आपण २१ व्या शतकात जगत आहोत, समाज सुधारला आहे असे आपण म्हणतो. परंतु, आजही अनेक ठिकाणी जात-पात, गरिबी आणि विषमता पाहायला मिळते. अशा काळात संत कर्ममेळा यांचे अभंग आपल्याला समतेची आणि न्यायाची शिकवण देतात.

त्यांनी ७०० वर्षांपूर्वी विठ्ठलाला विचारलेले प्रश्न आजच्या व्यवस्थेला विचारण्यासारखे आहेत. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाला सन्मानाचे जीवन मिळत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने 'पांडुरंग' प्रसन्न होऊ शकत नाही, हाच कर्ममेळा यांच्या चरित्राचा मुख्य गाभा आहे.

संत कर्ममेळा यांचे चरित्र वाचल्यानंतर आपल्याला समजते की, भक्ती म्हणजे केवळ हात जोडून गप्प बसणे नव्हे, तर अन्यायाविरुद्ध देवाच्या दारात का होईना, पण आवाज उठवणे होय. त्यांचा हा क्रांतिकारी आणि रोखठोक इतिहास वारकरी संप्रदायाला अधिक समृद्ध करतो.

संत चोखोबांच्या कुटुंबातील हा क्रांतिकारी वारसा आजच्या पिढीला समजणे अत्यंत गरजेचे आहे.



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## बुद्धीचे दान मागावे।

"मुसाफिर" वाचनीय मननीय
संकलन: दिशान फिचर्स




माणसाला हवी सत्ता. हवी मालमत्ता. तर त्यासाठी हवी बुद्धिमत्ता. निर्बुद्धाच्या घरी कुठून राहणार सुबत्ता ? त्याचबरोबर अंगी असावे बळ. अन्यथा नुसती बुद्धी होईल विफल. ही बुद्धीदेखील असावी विमल, त्या बुद्धीत नसावे कपट, छळ, बुद्धी आणि बल एकत्र, हा योग तसा विरल. म्हणूनच प्रार्थना करतात सकल. ही देवा, बुद्धीचा जाऊ दे मल. यजुर्वेदाचे ब्रह्मास्वयंभू ऋषी म्हणतात, या मेधां देवगणाः पितरश्चोपासने। तया मामद्य मेधवा अमे। मेधाविनं कुरु स्वाहा।।

वेळेवर कामी येणारी कुशल बुद्धिमत्ता देवांनाही हवी. आमच्या पूर्वजांत तर तिची नव्हतीच कमी. हे अग्निदेवा, तशीच तरलबुद्धी मला प्राप्त व्हावी. माझी बुद्धी लोकांपेक्षा व्हावी प्रभावी. तिच्यामुळे हवी ती सिद्धी लाभावी. यश, कीर्ती पदरी पडावी आणि त्यासाठीच मी दुर्गुणांची, दुर्भावनांची करतोय होळी. लोककल्याणासाठी अर्पितोय सर्वस्वाची आहुती. इदं मे ब्रम्हच क्षत्रं चोभे श्रियमश्नुताम । मयि देवा दधतु श्रियं उत्तमां तस्मै ते स्वाहा ।।

बुद्धीबरोबरच बलही समृद्धीसाठी आवश्यक. बल आणि बुद्धी परस्परोपकारक. ऐश्वर्यासाठी लाभदायक. त्यासाठी मी ठरावे लायक. म्हणून हा करतोय त्याग, श्रमाने मिळवलेल्या स्वामित्वाचा अर्पितो हविर्भाग. त्यासाठी करायचा यज्ञयाग. दुष्टांचे न फावावे म्हणौनि बुद्धीचे दान मागावे ।

एक होता देवदत्त, त्यांच्याजवळ होती एक उत्तम गाय. गोधनामुळे देवदत्ताचे कुटुंब होते सुखी. देवदत्त नेहमी प्रार्थना करायचा, की सर्वांनाच आनंदी राखी. सुविचार असो सदा सुखी. पण गावात चोरांची काय कमी? देवदत्ताच्या गावातही होता असाच एक चोर. बुद्धी आणि शक्ती यांचा अंगी जोर. गावात चोऱ्या करायचा, पण त्यातून सहीसलामत सुटायचा.

एकदा देवदत्ताची गाय हरवली. शोध शोध शोधली, पण नाही सापडली. मग तिची आशा सोडली आणि नवी घ्यायला बाजाराकडे धाव घेतली. आणि काय आश्चर्य? त्याची गाय तिथे विक्रीकरिता उभी होती. तो चोरच तिचा मालक म्हणवत होता. देवदत्ताने त्याची मानगुटी पकडली. बोल, तू ही माझी गाय चोरलीस आणि इथे विकायला आणलीस. होय ना? देवदत्ताच्या अंगी होते बल. त्यापुढे चोर झाला हतबल. त्याचा जीव घाबरला, पण लगेच सावरला आणि म्हणाला, ही गाय तुझी नाही.

लोक गोळा झाले. राजाचे शिपाईदेखील धावत आले. देवदत्ताच्या व त्या गायीच्या मालकाच्या भांडणात त्यांनी लक्ष घातले. देवदत्त राजसेवकांना म्हणाला, ही गाय याचीच आहे असे हा म्हणतो ना? मग सांगा म्हणावे, ही गाय डाव्या डोळ्याने आंधळी आहे की उजव्या ? ही माझी गाय असल्याने मी तत्काळ सांगू शकेन, तिचा आंधळा डोळा.

राजसेवक त्या चोराला म्हणाले, हे बरोबर आहे. ही गाव तुझी असेल, तर तिचा आंधळा डोळा कोणता ते सांगणे तुला जमेल.

चोर म्हणाला, हो, हो. मी सांगतो. ही गाय डाव्या डोळ्याने आंधळी आहे.

देवदत्त हसला व ओरडला. चूक! ही उजव्या डोळ्याने आंधळी आहे. चोर स्वतःला सावरत म्हणाला, तेच, तेच. म्हणतोय मी, तुझ्या बाजूने पाहले, तर डोळा ठरतो उजवाच. उजवाच डोळा आंधळा आहे तिचा. आता देवदत्त आनंदला. खो खो हसून म्हणाला, शिपायांनो, चोर कसा पकडला ? हा सपशेल खोटं बोलतोय. तुम्ही स्वतः पाहून घ्या. अहो, ही गाय आंधळीच नाही.

चोर भ्याला. गाय टाकून पळाला. शक्ती आणि युक्ती । दुःखातून देते मुक्ती ।

**– किशोर गांधी**

# श्री रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे ऑगस्टपासून विविध सहलींचे आयोजन

**अष्टविनायक, कोकण, ११ मारुती तसेच जगन्नाथपुरी, पिठापुरम, केरळ, नेपाळ, राजस्थान सहली होणार**

नगर – येथील श्रीरेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस यात्रा कंपनीने खास लोकाग्रहास्तव ऑगस्ट महिन्यापासून विविध सहलींचे आयोजन केले आहे. यामध्ये अष्टविनायक, कोकण, ११ मारुती तसेच जगन्नाथपुरी, पिठापुरम, केरळ, नेपाळ, राजस्थान सहलींचा समावेश आहे, अशी माहिती संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी दिली.

१८ ते २० ऑगस्ट दरम्यान तीन दिवस होत असलेल्या अष्टविनायक दर्शन यात्रा सहलीमध्ये अष्टविनायक दर्शनासह देहू, आळंदी तीर्थक्षेत्री भेट देता येणार आहे. ४ ते ९ सप्टेंबर दरम्यानच्या ६ दिवसांच्या यात्रेत पाली, हरिहरेश्वर, दिवे आगार, मुरुड जंजिरा, रत्नागिरी, गणपतीपुळे, पावस, आरे-वारे बीच, मार्लेश्वर, कोल्हापूर आदि ठिकाणी भेट देण्यात येणार आहे. ११ मारुती दर्शन यात्रा २५ ते २७ डिसेंबर २०२६ आणि २२ ते २४ फेब्रुवारी २०२७ अशी प्रत्येकी तीन दिवसांची दोन वेळा होणार आहे. यामध्ये श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगाव आदि ठिकाणे सहभागितांना पाहण्यास नेले जाईल.

एक आठवड्यापेक्षा जास्त कालावधीसाठी होणार्या जगन्नाथपुरी (गंगासागर दर्शन), पिठापुरम, केरळ, नेपाळ, राजस्थान यात्रांसाठी बुकींग सुरू झाले आहे. या यात्रा रेल्वेने होणार आहेत. जगन्नाथपुरी यात्रेत पर्यटकांना कलकत्ता, गंगासागर, भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाल, चिलका सरोवर तसेच पिठापुरम दर्शन यात्रेत पिठापुरम, कुरवपुरम, द्राक्षाराम, राजमुंद्री, अन्नावरम, काकीनाडा, विजयवाडा, श्रीशैलम आदि ठिकाणे पर्यटकांना पाहता येतील. जगन्नाथपुरी यात्रा २४ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ९ दिवसांची आहे. बुकींग अंतिम तारीख १० ऑगस्ट आहे. पिठापुरम यात्रा २१ ते ३० नोव्हेंबर अशी १० दिवस होत असून, याची बुकींग अंतिम तारीख १ सप्टेंबर आहे.

केरळ, नेपाळ व राजस्थान या यात्राही रेल्वेनेच होत आहेत. केरळ यात्रेत मुन्नार, थेक्कडी (पेरिवार), मदुराई, रामेश्वर, कन्याकुमारी, सुचिंद्रम, तिरुअंतपुरम, आलेप्पी (बॅकवॉटर) पर्यटकांना पाहता येतील. नेपाळ यात्रेत प्रयागराज, अयोध्या, वाराणसी, गोरखपूर, लुंबिनी, पोखरा, सोनोली बॉर्डर, काठमांडू, मनोकामना देवी, चितवण, पशुपतीनाथ, जनकपुरी, सितामढी तर राजस्थान यात्रेत जोधपूर, जैसलमेर, जयपूर, बिकानेर, पुष्करातिर्थ, चितोडगड, उदयपूर, माऊंटअबू, खाटुश्याम, सालासर बालाजी आदि ठिकाणांचा समावेश आहे. केरळ यात्रा ५ ते १८ डिसेंबर अशी १४ दिवसांची आहे. नेपाळ यात्रा ३० डिसेंबर २०२६ ते ११ जानेवारी २०२७ अशी १३ दिवसांची तर राजस्थान यात्रा ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ दरम्यान १४ दिवसांची आहे. बुकींग अंतिम तारीख १० ऑगस्ट आहे. पिठापुरम यात्रा २१ ते ३० नोव्हेंबर अशी १० दिवस होत असून, याची बुकींग अंतिम तारीख १ सप्टेंबर आहे.

सर्व शासकीय नियमांचे पालन कंपनीतर्फे करण्यात येते. पर्यटकांच्या संपूर्ण सुरक्षेची काळजी घेण्यात येते. रेणुका ट्रॅव्हल्समार्फत आयोजित करण्यात येणार्या सर्वच सहलींसाठी मर्यादित जागा असल्याने व्यवस्थित सोय होते. सहलीमध्ये स्वतः आयोजक पती-पत्नी तसेच त्यांचा कर्मचारीवर्ग सहभागी होत असल्याने घरगुती पद्धतीचे जेवण देण्यात येते. वृद्धांसाठी केअरटेकर असल्याने वैयक्तिक लक्ष देण्यात येते. राहण्याची उत्तम सुविधा करण्यात येते.

वाजवी व रास्त दर असल्याने ही कंपनी अल्पकाळातच लोकप्रिय ठरली असून पर्यटकांची खूप आधीच वेगवेगळ्या सहलींसाठी विचारणा होते. ही आपल्यावरील विश्वासाची पावती असल्याचे आम्हाला वाटते, असे संचालक श्यामकांत क्षीरसागर यांनी सांगितले. सहलींमध्ये सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस (डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, कुष्ठधाम रस्ता, निलम स्टोअर्सजवळ, पोलिस कॉलनी, सावेडी, नगर, मोबाईल क्रमांक ९९२२२४०५१५ व ९४०५०३२६९८) आणि सौ. दिपा जोशी (मो. ८३७९८४१२६१, ९४०४४ ०१६९९) येथे नाव नोंदवावे, असे सांगण्यात आले आहे.

# अहिल्यानगरमध्ये १९ जुलैला सातवी भव्य श्री जगन्नाथ रथयात्रा

## इस्कॉनच्या वतीने दिव्य आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन; हजारो भाविकांच्या उपस्थिती, हरिनामाच्या गजरात शहर होणार भक्तिमय

नगर – आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन), अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा महाराणी यांच्या सातव्या श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन १९ जुलै रोजी करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा आध्यात्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा होणार असून, अहिल्यानगरसह जिल्हाभरातून हजारो भाविक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

रथयात्रेचा शुभारंभ दुपारी २ वाजता श्री मार्कंडेय संकुल, नेप्ती नाका, दातारंगे मळा, अहिल्यानगर येथून होणार आहे. त्यानंतर भगवान श्री जगन्नाथांचा रथ शहरातील प्रमुख मार्गांवरून नगरप्रदक्षिणा करणार असून, संपूर्ण परिसर हरे कृष्ण, हरे राम या हरिनामाच्या अखंड गजराने, टाळ-मृदंगाच्या निनादाने, भक्तिगीतांनी आणि नृत्याने दुमदुमून जाणार आहे. विविध भागांतील भक्तगण, महिला, युवक-युवती, विद्यार्थी आणि लहान मुलेही उत्साहाने या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.



वैदिक परंपरेनुसार भगवान श्री जगन्नाथांची रथयात्रा ही केवळ धार्मिक मिरवणूक नसून, ती प्रत्येक भक्ताला भगवानांच्या सान्निध्याचा अनुभव देणारा अत्यंत पवित्र उत्सव मानला जातो. या दिवशी भगवान स्वतः मंदिराबाहेर येऊन सर्वसामान्यांना दर्शन देतात, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे रथाचे दर्शन, रथ ओढण्याची सेवा आणि हरिनाम संकीर्तनात सहभागी होणे अत्यंत पुण्यदायी मानले जाते.

रथयात्रे दरम्यान भगवान श्री जगन्नाथांचे दर्शन, भक्तिरसपूर्ण कीर्तन, हरिनाम संकीर्तन, वैदिक संस्कृतीचे दर्शन आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेण्याची सुवर्णसंधी भाविकांना मिळणार आहे. याशिवाय सायंकाळी ७ वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून, उपस्थितांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

इस्कॉन अहिल्यानगरच्या वतीने शहरातील सर्व नागरिक, विविध सामाजिक संस्था, व्यापारी, विद्यार्थी, युवक-युवती, महिला तसेच सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी कुटुंबासह या रथयात्रेत सहभागी होऊन भक्ती, सेवा आणि आध्यात्मिक आनंदाचा दिव्य अनुभव घ्यावा, असे निमंत्रण देण्यात आले आहे. यंदाची सातवी श्री जगन्नाथ रथयात्रा ही अहिल्यानगरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात आणखी भर घालणारी ठरणार असून, हरिनामाच्या गजरात संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

### कार्यक्रमाची माहिती

कार्यक्रम : सातवी भव्य श्री जगन्नाथ रथयात्रा. आयोजक : आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन), अहिल्यानगर. १९ जुलै वेळ : दुपारी २ वाजता. प्रारंभ स्थळ : श्री मार्कंडेय संकुल, नेप्ती नाका, दातारंगे मळा, अहिल्यानगर. विशेष आकर्षण : भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा महाराणी यांची भव्य रथयात्रा, हरिनाम संकीर्तन, भक्तिरसपूर्ण कीर्तन, दिव्य दर्शन आणि सायंकाळी ७ वाजता महाप्रसाद.



सावन कृपाल रुहानी मिशन अहिल्यानगरच्या वतीने वाळूंज येथील आश्रमात दिंड्यांचे स्वागत करून दोन अद्ययावत रुग्णवाहिका गुणे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते दिंडी चालकांकडे सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी मिशनचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज यांच्यासह पदाधिकारी.

# सावन कृपाल रुहानी मिशन अहिल्यानगरच्यावतीने वारकऱ्यांसाठी दोन अद्ययावत रुग्णवाहिका अर्पण

नगर – सावन कृपाल रुहानी मिशन अहिल्यानगरच्या वतीने सोलापूर रोडवरील वाळूंज येथील आश्रमात पंढरपूरला जाणाऱ्या दिंड्यांचे स्वागत करून दिंडीमधील सर्व वारकऱ्यांसाठी विविध खाद्यपदार्थांचा अल्पोपहार, चहापान व विसाव्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच दिंडीतील वारकऱ्यांना आपत्कालीन व तातडीच्या वैद्यकीय सुविधा मिळावी यासाठी दोन अद्ययावत रुग्णवाहिका गुणे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते दिंडी चालकांकडे सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, अनिलकुमार बजाज, सुनील मिस्कीन, राजेश कुकरेजा यांच्यासह सेवेकरी नागरिक व महिला उपस्थित होते. धन धन सद्गुरू तेराही आसरा... या जयजयकाराने व विठ्ठलाच्या नामघोषात हा सोहळा झाला.



# सायकलवर पंढरीची वारी

भिंगार जवळील झोडगे मळा येथील संदीप सूर्यकांत झोडगे यांनी नगर ते पंढरपूर अशी सायकलवर पंढरीची वारी पूर्ण केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गुरुदेव आचार्य भगवंत यांची अदृश्य शक्ती सर्वत्र असल्याने संकटे आपोआपच दूर

**उपाध्याय श्री प्रविणऋषीजी म.सा. यांचे निरुप; समर्पण चातुर्मास धर्मयात्रेचे गोवर्धन अपार्टमेंट येथे उत्साहात स्वागत**



मार्केटयार्ड येथील गोवर्धन अपार्टमेंट येथे समर्पण चातुर्मास धर्मयात्रे प्रसंगी उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा.यांनी धार्मिक प्रभावना प्रवचन दिले.

नगर – गोवर्धन पर्वताची कथा खूप काही शिकवून जाते. भगवान श्रीकृष्णाने इंद्र देवाची पूजा बंद केली आणि गोवर्धन पर्वताची पूजा सुरू केली. प्रस्थापित सत्तेच्या विरोधात गेल्यानंतर ती सत्ता आक्रमक होते. इंद्राने मोठ्या प्रमाणात पाऊस पाडला. गोकुळात सर्व प्रजा चिंताक्रांत झाली. त्यावेळी श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वताचे छत बनवू हा विचार मांडला. त्यावेळेस ही गोष्ट अशक्यप्राय आहे असे काही लोकांना वाटत होते. परंतु श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन उचलून धरला व गोकुळाचे संकट दूर झाले. काही लोकांना असे वाटले की माझ्या काठीवर गोवर्धन पर्वत उभा आहे परंतू जोपर्यंत श्रीकृष्णाची करंगळी गोवर्धन पर्वताला टेकलेली होती. तोपर्यंत गोवर्धन पर्वत उभाच होता. त्याचप्रमाणे गुरुदेव आचार्य भगवंत यांची अदृश्य शक्ती सर्वत्र असल्याने आलेली सर्व संकटे आपोआप च दूर होत आहे. सर्वांनी आपल्यातला मी पणा दूर करावा. जे काही चांगले होत आहे ते गुरुदेवांच्या कृपेने होत आहे असे निरुपण उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा.यांनी केले आहे.

मार्केट यार्ड येथील गोवर्धन अपार्टमेंट येथे समर्पण चातुर्मास धर्मयात्रे प्रसंगी उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा.यांनी धार्मिक प्रभावना प्रवचन दिले. याप्रसंगी तीर्थेशऋषीजी म.सा., समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष बाबूशेठ बोरा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, भाजपाचे वसंत लोढा, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, ईश्वर बोरा, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम आदींसह कार्यक्रम संयोजक अजित शिंगवी, सुरज गांधी, किशोर लुनिया, प्रितम बोगावत, प्रवीण बडदाते, विपुल गांधी, ऋषभ डागा, ललित कटारिया, राजेंद्र गांधी, सिद्धेश मेहेर, नंदलाल बंग, शरद मेहेर, संदीप गुजराती, रोहित गांधी, जितेंद्र शाह, अनुज नहार, अर्पिता शिंगवी, शीला गांधी, गुंजन शिंगवी, नव्या गांधी, प्रिया नहार, समृद्धी चोरडिया, अश्विनी बोगावत, स्नेहल गांधी, प्रिया डागा, लीना बडदाते आदी उपस्थित होते.

उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा.म्हणाले, पूर्ण देशात एकही हिंदू राज्य नव्हते. त्यावेळेस १६ वर्षाचे छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले. त्यांना स्वकियांनी विरोध केला. औरंगजेबाला जर कोणी साथ दिली नसती तर आपल्या देशाचा इतिहास वेगळाच होता. जर तुम्हाला चांगले काम करता आले नाही तर चुकीचे काम करणाऱ्यांना पाठिंबा देऊ नका.

दिंडी हा संत ज्ञानेश्वर माऊलींचा विचार आहे. पाखंडींची पूजा बंद केली त्यांना साथ दिली नाही. पुजारी, पुरोहित, पंडित नसताना देखील आपण भगवंताला जोडले जाऊ शकतो हा विचार ज्ञानेश्वर माऊलींनी मांडला. विसोबा, चोखोबा, तुकोबाराय, गोरोबा काका, एकनाथ महाराज यांना सर्वांना सोबत घेऊन जाणारी दिंडीची परंपरा महाराष्ट्राची आहे. जो प्रभू को जोडता है वो प्रभू का हो जाता है हे बोलणे त्या काळात सोपे नव्हते. विनाशातून विकास दाखविणाराच युगपुरुष असतो असे निरुपण उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा.यांनी केले आहे.

अध्यक्ष बाबूशेठ बोरा म्हणाले, आचार्य भगवंत आनंदऋषीजी म.सा.उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा. व तीर्थेशऋषीजी म.सा यांच्या चरणी प्रथम वंदन करतो. समर्पण चातुर्मास धर्मयात्रेचा हा २४ वा दिवस आहे. केडगाव येथून सुरू झालेली धर्मयात्रेचे आगरकर मळा, सावेडी, नागापूर, महावीरनगर, भिंगार तसेच आता शहर परिसरात मोठ्या भक्ती भावाने स्वागत करण्यात येत आहे. येथील गर्दी पाहता समर्पण चातुर्मास हा यशस्वी होत आहे ही प्रचिती येते. येत्या २६ तारखेला समर्पण चातुर्मास निमित्त विनायकनगर येथे बोरा फार्म्स वर ३००० जोडप्यांद्वारे भक्तांबर अनुष्ठान करत गुरुदेवांचं भव्य दिव्य असा मंगल प्रवेश आनंदधाम येथे होत असल्याने या धार्मिक सोहळ्यासाठी सर्वांनी मोठ्या प्रमाणात बोरा फार्म्स येथे उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रास्ताविकात अशोक शिंगवी म्हणाले, राष्ट्रसंत आचार्य भगवंत श्री आनंदऋषीजी म.सा.यांना वंदन करतो. गोवर्धन अपार्टमेंट येथे गुरुदेव उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा.व तीर्थेशऋषीजी म.सा.यांचे आगमन होताच चैतन्यमय प्रसन्न व आनंदीमय वातावरण निर्माण झाले आहे. गुरुदेवांच्या कृपेने व कृपा आशीर्वादाने खूप चांगल्या पद्धतीने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शहर व परिसरातील जैन समाज बांधव आले त्यांचे मी स्वागत करतो व आभार मानले.

# अहिल्यानगरच्या समृद्धी वाकचौरेची नासा शैक्षणिक भेटीसाठी निवड

## हायड्रोजन इंधनावरील स्टोव्हचा प्रकल्प यशस्वी; जागतिक संशोधन



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी समृद्धी प्रविण वाकचौरे हिने स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत स्वयंपाक प्रणालीवर आधारित Hydrogen Fuel Operated Stove for Sustainable Cooking हा अभिनव विज्ञान प्रकल्प विकसित करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या प्रकल्पाला ईशा फाउंडेशनच्या विज्ञान स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला असून ३५ हजार रुपयांचे पारितोषिकही प्राप्त झाले आहे. तसेच या प्रकल्पाच्या आधारे तिची नासा (NASA) शैक्षणिक भेटीसाठी निवड झाल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

समृद्धीने विकसित केलेला हा प्रकल्प पारंपरिक एलपीजी आणि सरपणाला पर्याय म्हणून हरित हायड्रोजनचा सुरक्षित व पर्यावरणपूरक वापर करून स्वयंपाक करण्याच्या संकल्पनेवर आधारित आहे. हायड्रोजनच्या ज्वलनानंतर कार्बन डायऑक्साइडऐवजी मुख्यतः पाण्याची वाफ निर्माण होत असल्याने भविष्यातील स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

भारतातील ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर सरपणाचा वापर केला जातो, तर शहरी भागात एलपीजीच्या वाढत्या किमती सर्वसामान्यांसाठी आर्थिक भार ठरत आहेत. धुरामुळे महिलांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, जंगलतोड, इंधन गोळा करण्यासाठी लागणारा वेळ आणि वाढते कार्बन उत्सर्जन या समस्यांचा विचार करून समृद्धीने या प्रकल्पाची संकल्पना विकसित केली.

या मॉडेलमध्ये कमी दाबाच्या हायड्रोजन सिलेंडरमधून नियंत्रित पद्धतीने गॅसचा पुरवठा केला जातो. त्यामध्ये दाब नियंत्रक, फ्लो कंट्रोल व्हॉल्व्ह, विशेष बर्नर, इग्निशन प्रणाली, फ्लेम अरेस्टर, गॅस गळती शोधक आणि ऑटो शट–ऑफ यंत्रणा अशा विविध सुरक्षा सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रदूषणमुक्त स्वयंपाक शक्य होऊ शकतो, अशी संकल्पना या प्रकल्पातून मांडण्यात आली आहे. या प्रकल्पाचा उपयोग केवळ घरगुती स्वयंपाकापुरता मर्यादित नसून सामुदायिक स्वयंपाकगृहे, वसतिगृहे, कॅन्टीन, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स तसेच लघु व मध्यम उद्योगांमध्येही होऊ शकतो. हा प्रकल्प भारत सरकारच्या National Green Hydrogen Mission आणि स्वच्छ ऊर्जा उपक्रमांशी सुसंगत असल्याचे प्रकल्प अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या विज्ञान प्रकल्पाचा प्रवास २१ जुलै २०२४ रोजी संकल्पना मांडण्यापासून सुरू झाला. ६ डिसेंबर २०२४ रोजी प्रारूप मॉडेल तयार करण्यात आले. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी समस्या निवेदन सादर करण्यात आले, तर २८ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम मॉडेल सादर करण्यात आले. त्यानंतर २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रकल्पाची निवड झाली. २१ जून २०२६ रोजी नासा शैक्षणिक भेटीसाठी निवड झाल्याची माहिती देण्यात आली असून ११ जुलै २०२६ रोजी मान्यता पत्र प्राप्त झाले. या विज्ञान प्रकल्पासाठी विजय दळवी यांनी मार्गदर्शक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ विज्ञान प्रकल्प तयार करण्यापुरते मार्गदर्शन न करता, समाजातील प्रत्यक्ष समस्यांची ओळख करून त्यावर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याची प्रेरणा दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने विकसित केलेल्या विज्ञान प्रकल्पाला राज्यस्तरावर यश मिळाल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संधी प्राप्त होणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. स्वच्छ ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळ देणारा हा प्रकल्प भविष्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो. साध्या कल्पनेपासून प्रत्यक्ष कृतीपर्यंत आणि तेथून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यतेपर्यंतचा समृद्धी वाकचौरे हिचा प्रवास नव्या पिढीतील संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# अहमदनगर महाविद्यालयात करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथग्रहण



नगर – महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिन निमित्त करिअर संसद पदाधिकारी शपथग्रहण समारंभ उत्साहात झाला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. विलास नाबदे तसेच प्रबंधक (रजिस्ट्रार) श्रीमती कल्पलता भिंगारदिवे उपस्थित होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संयुक्त राष्ट्र महासभेने २०१४ मध्ये १५ जुलै हा दिवस जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. युवकांमध्ये कौशल्य विकास, रोजगारक्षमता, उद्योजकता आणि शाश्वत विकासाबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण (SDG-4) आणि सन्मानजनक रोजगार व आर्थिक विकास (SDG-8) या शाश्वत विकास उद्दिष्टांना चालना देणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. याच उद्देशाने महाविद्यालयात करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करून त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

करिअर संसदेच्या मंत्रिमंडळात पुढील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली : मुख्यमंत्री – रोहित बप्पासाहेब काकडे, नियोजन मंत्री – स्नेहल कैलास गोरडे, कायदा व शिस्तपालन मंत्री – कोमल भाऊसाहेब सटाले, सामान्य प्रशासन मंत्री – साक्षी सुरेश भोसले, माहिती व प्रसारण मंत्री – सुहानी मुकुंद वाबळे, उद्योजकता विकास मंत्री – गीतांजली भगवान जगताप, स्वयंरोजगार विकास मंत्री – पंकज किशोर घोडके, कौशल्य विकास मंत्री – ज्ञानेश्वरी धनंजय जाधव, संसदीय कामकाज मंत्री – शशिकांत विनोद गोरडे, महिला व बालकल्याण मंत्री – श्रुती सुभाष वांडेकर, सभासद – श्रद्धा जालिंदर कोरडे, यावेळी विद्यार्थ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी यांनी सांगितले की, करिअर संसद हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आणि भविष्यातील ध्येय निश्चित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचा पुरेपूर लाभ घ्यावा.

या प्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुधीर वाडेकर व डॉ. सचिन राळेगणकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन करिअर कट्टा समन्वयक डॉ. भागवत परकाळ यांनी केले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्छात नमुद केलेल्या बिनशेती प्लॉटस मिळकत विद्यमान मालक १) श्री.बाबासाहेब अंबादास बारस्कर, २) चतुरभुज गुलाबराय खानचंदाणी, ३) प्रशांत संभाजी निमसे व ४) दिगंबर बबनराव भोसले, सर्व रा. सावेडी, अहिल्यानगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांना सदर प्लॉटस मिळकती विक्री करण्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. त्यांनी आमचे अशिलांस कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविलेले आहे. तसेच सदर प्लॉटस मिळकती हया निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉटस मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा मनाई, दावा,लिज,गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, जनरल मुखत्यारपत्र, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारचे तक्रारा अगर हरकत चालणार नाही असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

१) मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं.४६/२/१ पै मधील बिगरशेती प्लॉटस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे–

| प्लॉट नंबर | हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १९ | १० | १७६.९४० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. २० | ९ मी. रस्ता | ओपन स्पेस |
| २० | १२ | १७३.३६० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. २१ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. १९ |
| २१ | १४ | १६९.७८० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. २२ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. २० |
| २२ | १६ | १६६.५८० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. २३ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं.२१ |
| २३ | १८ | १६५.९९० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. २४ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. २२ |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.
अहिल्यानगर
दि. १६/७/२०२६

**ॲड. स्वप्नील चंद्रशेखर भावसार**
(बीएसएल, एलएलबी)
पत्ता– फ्लॅट नं. ३०५, विजया रेसिडेन्सी, चितळे रोड, अहिल्यानगर,
मो. ९०२८०२६३२६


# 'लोडशेडिंग' मुळे वारकऱ्यांची गैरसोय, शिवसेना आक्रमक; अन्यथा महावितरण कार्यालयात धरणे आंदोलनाचा इशारा

नगर – पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी दिंड्यांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात सुरू असलेल्या विजेच्या लोडशेडिंगविरोधात शिवसेना आक्रमक झाली आहे. महावितरणचे अहिल्यानगर येथील अधीक्षक अभियंता सुभाष घाटोळ यांना निवेदन देत संध्याकाळी ७.३० ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू असलेले लोडशेडिंग तात्काळ रद्द करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महावितरणच्या कार्यालयात धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.



वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी लोडशेडिंग तातडीने बंद करावे या मागणीचे निवेदन महावितरणचे अधीक्षक अभियंता सुभाष घाटोळ यांना देताना शिवसेनेचे संदेश कार्ले, रामदास भोर आणि रणजीत परदेशी.

शिवसेना नेते संदेश कार्ले, नगर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रामदास भोर आणि रणजीत परदेशी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या पंढरपूरकडे हजारो वारकरी दिंड्या मार्गस्थ असून नगर सोलापूर महामार्ग, नगर दौण्ड महामार्गावर अनेक गावांमध्ये दररोज १० ते १२ दिंड्यांचा मुक्काम होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीतून जाण्यासाठी चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत संध्याकाळच्या वेळेत वीजपुरवठा खंडित केल्यामुळे वारकऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने साप, विंचू यांसारख्या विषारी प्राण्यांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या अंधारात वीज नसल्याने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ वारकऱ्यांना अंधारामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून मुक्कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा विस्कळीत होत आहेत.

यावेळी सरकारच्या धोरणावरही निशाणा साधला. एकीकडे सरकार शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीजबिल माफी जाहीर करत आहे आणि दुसरीकडे राज्यात लोडशेडिंग सुरू केले जात आहे. ही विरोधाभासी भूमिका असून वारकऱ्यांना त्याची शिक्षा भोगावी लागत आहे.

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून वारकरी दिंड्यांच्या मार्गावरील लोडशेडिंग रद्द करावे, अशी मागणी करत मागणी मान्य न झाल्यास अधीक्षक अभियंत्यांच्या दालनासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना नेत्यांनी दिला आहे.


## जाहीर नोटीस उत्तर

तमाम लोकांस या जाहीर नोटीस उत्तराद्वारे कळविणेत येते की–
दि. ११/०७/२०२६ रोजी दैनिक नवामराठा या वृत्तपत्रात स. नं. १९०/१+२+३/अ चे क्षेत्र २.२५ आर व स. नं. १९०/१+२+३/ब चे क्षेत्र २.४१ आर मौजे नालेगाव ता. नगर जि. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगाव येथील मिळकतीबाबत ॲड. क्रांती अशोक बागुल यांचे मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्द झालेली होती व त्यामध्ये मे. कोर्टात प्रलंबीत उशीर माफ होवुन मिळणेचा अर्ज व प्रलंबीत दिवाणी अपील्ल नं. ४५८/२०२५ यांचा उल्लेख करण्यात आलेला होता. त्याबाबत आमचे अशिल श्री. रविंद्र मदनलाल मुथ्या व श्रीमती कल्पना रविंद्र मुथ्था यांचे वतीने सदर जाहिर नोटीसीस उत्तर देण्यात येते की, सदर नोटीस मध्ये नमुद करण्यात आलेली कथने खोटी व लबाडीची असुन ती आमचे अशिलास कबुल व मान्य नाही. वास्तविक पाहता सदर प्रलंबीत अपीलातील नमुद उपोरक्त मिळकती आमच्या अशिलांच्या मालकीच्या असुन आमचे अशिलाचे कब्जेबहिवाटीस आहेत. आमचे अशिलास सदर मिळकतीचे मालकी हक्काने उपभोग घेणे अगर त्यांचे मर्जीनरुप संदर मिळकतीचे विल्हेवाट लावणेचा पुर्ण अधिकार आहे. प्रत्यक्षात सदर मिळकतीबाबत मे. कोर्टातील मुळ दावा नं. ३७८/२०१८ गुणदोषावर फेटाळुन लावलेला आहे व मिळकतीबाबत आमचे मालकी हक्क व ताबा कायम केला आहे. सदर मिळकतीत श्री. खंडु महादु शेटे अगर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबध नाही केवळ आमचे अशिलास त्रास देण्याचे हेतुने सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आल्याचे दिसते. येणेप्रमाणे नोटीस उत्तर प्रसिध्द केले असे.

दि. १६/०७/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. संदीप शांताराम वाघ** (बीएएलएलबी)
जुनी कोर्ट गल्ली, लक्ष्मीनारायण बिल्डींग,
अहिल्यानगर. मो नं. ९४०४३२४८२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: मौजे भिस्तबाग ता.जि. अहिल्यानगर येथील लोकांना कळविण्यात येते की, मौजे भिस्तबाग येथील **गट नं. २४/२३अ २/प्लॉट सी. ९** चे एकुण क्षेत्र १२३.७५ चौ.मी. हा प्लॉट **प्रदिपकुमार गंगाधर राहुरकर** यांच्या मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील आहे. सदर प्लॉट व त्यावर असलेले बांधकाम त्यांनी त्यांच्या जरुरीच्या कारणासाठी विक्रीस काढलेला असुन, त्यांचे बरोबर आमचे अशिलाचा कायम खरेदी विक्रीबाबत प्रक्रिया सुरु आहे. त्यापोटी आमच्या अशिलाने त्यांना काही रक्कम विसार दाखल दिलेली आहे.

सदर मिळकतीचे प्रदिपकुमार गंगाधर राहुरकर हेच मालक असुन त्यांनी सदर मिळकतीबाबत कुणाबरोबरही खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, करारनामा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नसल्याचे नमुद केलेले आहे. तथापि सदर प्लॉटबाबत व त्यावरील बांधकामाबाबत त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणासही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन त्यांचेकडील असणाऱ्या पुराव्यासह ७ दिवसात लेखी कळवावे, अन्यथा आमचे अशिल त्यांचेबरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर आलेली कोणाचीही तक्रार चालणार नाही. विनाकारण कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

तारीख: १६/०७/२०२६

**ॲड. सौरभ सुभाष काकडे** (एल.एल.एम.)
३८७६, काकडे सदन, नांगरे गल्ली अहमदनगर
मो. ९४२२३३३३३९




माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ झाला.

# माऊंट सिनायमध्ये विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ झाला. पेमराज सारडा महाविद्यालयाचे एन सी सी अधिकारी कॅप्टन डॉ. अंकुश आवारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी पदाधिकाऱ्यांना प्रमुख पाहुणे कॅप्टन डॉ. आवारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.


गुप्त मतदान पद्धतीने निवडण्यात आलेले पदाधिकारी पुढील प्रमाणे – हेड बॉय – दक्ष अंकुश, हेड गर्ल – गौरी शेडाळे, व्हाईस हेड बॉय – स्वराज काळे, व्हाईस हेड गर्ल – साक्षी राठोड, त्याचप्रमाणे कंपनी सिनियर्स म्हणून छत्रपती शिवाजी कंपनी – जॉय साळवे, किंग डेव्हिड कंपनी – अरहान शेख, छत्रपती संभाजी कंपनी – साक्षी म्हस्के व राणी लक्ष्मीबाई कंपनी – साक्षी राठोड या विद्यार्थ्यांची तर इयत्ता पहिली ते दहावीच्या वर्ग प्रतिनिधींचीही निवड करण्यात आली. जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाने सातत्यपुर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना कॅप्टन डॉ. अंकुश आवारे यांनी केले.

मुख्याध्यापिका जयश्री खरात यांनी प्रास्ताविकात विद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करीत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

सरोज कुमारी यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन उज्वला पंडित यांनी केले. सविता पाटोळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर उबाळे, मुजाहीद शेख, कमलेश गमरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# छावणी परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय यश; 'स्नेहबंध'तर्फे गौरव

नगर – पी.एम.श्री. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा, छावणी परिषद, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत कु. आयेशा शेख हिने स्थान मिळविले, तर एनएमएमएस जिल्हा गुणवत्ता यादीत वेदांत साबळे व साई कोष्टी यांनी यश मिळविले.



यशस्वी विद्यार्थ्यांचा छावणी परिषद कार्यालयात छावणी परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी व स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते सन्मानपत्र व मेडल देऊन गौरव करण्यात आला.

या यशामागे सोन्याबापू लबडे, सुभाष भारूड, स्नेहल लवांडे व सीमा चोभे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **विजय जनार्दन राजहंस व विजय जनार्दन राजहंस यांचे विकसक म्हणून नामदेव बिल्डर्स चे प्रोप्रा. चंद्रशेखर पुंडलिक जगताप दोघे रा. सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून, **सदर मिळकतीवर श्री रुख्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा शाखा पाईपलाईन रोड, अ.नगर या बँकेचे कर्ज आहे.** व्यतिरिक्त सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चाल वाद असल्यास अथवा **विसारपावती, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन : –**
डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ. नगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. ११/२ मधील प्लॉट नं. ३८ याचे एकूण क्षेत्र १८१.१७ चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट व यावरील "राजहंस अपार्टमेंट" या अपार्टमेंट मधील स्टिल्ड ग्राऊंड फ्लोअर वरील फ्लॅट नं. १०१ याचे क्षेत्र ४५.०७ चौ.मी. + बाल्कनी एरिया ७.२० चौ.मी. व फ्लॅट नं. १०२ याचे क्षेत्र ४५.०७ चौ.मी. व फर्स्ट फ्लोअर वरील फ्लॅट नं. २०१ याचे क्षेत्र ४५.०७ चौ.मी. व फ्लॅट नं. २०२ याचे क्षेत्र ४५.०७ चौ.मी. + बाल्कनी एरिया ७.२० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत.**
**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे.**
पुर्वेस :– प्लॉट नं. ३९, दक्षिणेस :– सर्व्हे नं. ११/३८ पैकी,
पश्चिमेस :– प्लॉट नं. ३७ उत्तरेस :– रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
दिनांक :– १६/०७/२०२६, अहिल्यानगर

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– शॉप नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर मोनं.९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **५ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १६/०७/२०२६**
**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**
**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील शहर नगर येथील खालील वर्णनाची मिळकत–

| सि स नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| २७३०/ब/३ | १०७.८ चौ.मी. |

**यावर बांधलेल्या इमारतीचे नांव "ताज कॉम्प्लेक्स" यापैकी पहिल्या मजल्यावरील शॉप नंबर १०१ याचे कारपेट क्षेत्र १२.०५ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १४.७० चौ.मी. जीना, समोरील कॉमन पॅसेज सहीत (जीना, समोरील कॉमन पॅसेज सोडुन घोषणापत्राच्या चुक दुरुस्तीलेखाप्रमाणे वापरायोग्य कारपेट क्षेत्र ७.५४ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १०.४० चौ.मी.) आहे त्या स्थितीत हि मिळकत.**
यांसी चतुःसीमा –
पुर्वेस : कॉमन पॅसेज व जीना दक्षिणेस : तळावर ओपन कॉमन लेन
पश्चिमेस : कॉमन लेनची ओपन स्पेस उत्तरेस : शॉप नंबर १०२
विद्यमान मालकांचे नाव– सय्यद शकील मोईनोद्दीन
रा. घर नंबर २०९६, करशेठजी रोड, नालबंदखुंट, अहिल्यानगर.

**ॲड. आर टी शर्मा**
मो.नं.९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४, १७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत **विद्यमान मालक १.इम्रान चाँद शेख २.मोहसीन चाँद शेख ३.शेख सबा मोहसीन ४.कमरुन्निसा इम्रान शेख ५ .मोहम्मद ताहा इम्रान शेख ६.मोहम्मद तुफैल इम्रान शेख** सर्व रा.प्लॉट नं.१, लोखंडी पुलाजवळ, मल्हार चौक, स्टेशन रोड, अहमदनगर मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकत विक्री करण्याबाबत आमचे अशिलाबरोबर कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले असुन,विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णनः** जिल्हा तुकडी अहिल्यानगर/अहमदनगर, तालुका नगर पैकी, महानगरपालिका हद्दीतील, शहर अहिल्यानगर/अहमदनगर येथील **शहाजी रोड बोळीत/संकलेचा बोळ भागातील** मे.दु.निबंधक साहेब, अहिल्यानगर/अहमदनगर यांचे कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सि.स.नं. | म्यु.घर नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३३५५ | २५१६ | २५९.२० |

**या संपुर्ण बखळ जागा मिळकती बाबत.**
**यांसी चतः:सिमा–**
पुर्वेस – रस्ता दक्षिणेस – सि. स. नं. ३३५४
पश्चिमेस – सि. स. नं. ३३५६ उत्तरेस – लागु सि.स.नंबर
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि.१६/०७/२०२६
अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
(बीएएलएलबी)
**कुरेशी फैजान फारुक** (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली,
अहमदनगर मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **श्री. गणपत रघुनाथ पाडळे (७/१ २ उताऱ्याप्रमाणे) गणेश रघुनाथ पाडळे (आधार कार्ड प्रमाणे), रा. हिंगणगाव, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून रजिस्टर साठेखत लिहुन व नोंदवुन दिलेले असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडुन मोठी रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध,ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हहकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे हमीदपूर येथील जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –
**सर्व्हे नंबर १६० चे क्षेत्र २ हे. ७४ आर + पो. ख. ० हे. ०९१ आर असे एकुण क्षेत्र २ हे. ७५ आर याचा आकार ९ रु. ३९ पैसे यापैकी खाते नं. ५९२ मधील विद्यमान मालक यांचे मालकी हिश्याची संपुर्ण ० हे. १६.६४ आर जमीनीबाबत.**
**यासी चतुः सिमा –**
पूर्वेस : शिव रस्ता दक्षिणेस : गट नं. १६० पैकी
पश्चिमेस : गटनं. १५८ व १५९ उत्तरेस : गट नं. १६० पैकी
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. १४/०७/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
(बीएएलएलबी)
**कुरेशी फैजान फारुक** (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली,
अहमदनगर मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

# धम्माल मनोरंजन

### सुविचार



**हरलो असे वाटले की हार ठेवलेलीच। हरलो नाही असे वाटेपर्यंत तुम्ही खेळ जिंकत असता.**

## दिनविशेष १७ जुलै

१८८९: अमेरिकन लेखक अर्लस्टॅनले गार्डनर यांचा जन्म. (मृत्यू: ११ मार्च १९७०)

१९१७: भारतीय अभिनेते, गायक आणि पटकथालेखक बिजोन भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १९७८)

१९१८: ग्वाटेमालाचा राष्ट्राध्यक्ष कार्लोसमनुएल अराना ओसोरिया यांचा जन्म.

१९१९: संगीतकार स्नेहल भाटकर यांचा जन्म. (मृत्यू: २९ मे २००७)

१९२३: कूपर कार कंपनी चे सहसंस्थापक जॉन कूपर यांचा जन्म. (मृत्यू: २४ डिसेंबर २०००)

१९३०: दलित साहित्यिक बाबूराव बागूल यांचा जन्म. (मृत्यू: २६ मार्च २००८)

१९५४: जर्मनीच्या चॅन्सेलर अँजेला मेर्केल यांचा जन्म.

१९२७: औड-स्ट्रिजडर्स लेगिओनचे संस्थापक, डच कार्यकर्ते प्रोस्पेर इगो यांचा जन्म (मृत्यू : २३ जानेवारी २०१५)

१९२१: अन्नपूर्णा १ शिखर पहिल्यांदा मॉरिस हेझॉंग यांच्यासोबत सर करणारे फ्रेंच गिर्यारोहक लुई लाचेनल यांचा जन्म (मृत्यू : २५ नोव्हेंबर १९५५)

१९२०: लेसरचे शोधक गॉर्डन गूल्ड यांचा जन्म (मृत्यू : १६ सप्टेंबर २००५)

मृत्यू१७९०: स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडम स्मिथ यांचे निधन. (जन्म: ५ जून १७२३)

१९९२: अभिनेत्री शांता हुबळीकर यांचे निधन. (जन्म: १४ एप्रिल १९१४)

१९९२: बंगाली हिंदी चित्रपटातील अभिनेत्री आणि गायिका कानन देवी यांचे निधन. (जन्म: २२ एप्रिल १९१६)

२००५: युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान सर एडवर्ड हीथ यांचे निधन.

२०१२: समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य मृणाल गोरे यांचे निधन. (जन्म: २४ जून १९२८)

२०१२: भारतीय-इंग्रजी राजकारणी मार्शा सिंह यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४)

२०२०: भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक - पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार सी.एस. शेषाद्री यांचे निधन (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२)

२००३: मिनॉक्सचे शोधक वॉल्टर झाप यांचे निधन (जन्म: ४ सप्टेंबर १९०५)


२००२: नाटोचे ५वे महासचिव, डच राजकारणी आणि मुत्सद्दी जोसेफ लुन्स यांचे निधन (जन्म: २८ ऑगस्ट १९११)

१९५६: इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे सहसंशोधक बोडो वॉन बोररी यांचे निधन (जन्म: २२ मे १९०५)

१९२८: मेक्सिको देशाचे ४६वे राष्ट्राध्यक्ष अल्वारो ओब्रेगन यांचे निधन (जन्म: १७ फेब्रुवारी १८८०)

१८१२: स्कॉटिश उद्योगपती, जॉन ब्रॉडवुड आणि सन्सचे सहसंस्थापक जॉन ब्रॉडवुड यांचे निधन (जन्म: ६ ऑक्टोबर

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) कदाचित
६) शांत, विराण
९) एक पक्षी
१०) विपुलता, चंगळ
१२) मत नोंदणारा
१३) प्रत्येक महिन्याला
१४) हे शब्द म्हणजे एखाद्या नामाला जोडून आले तर ज्याचेपाशी आहे असा अर्थ होतो
१७) जर चा जोडी
१८) न्युजपेपर
२२) विश्रांती
२४) मीठ (हिं.)
२५) कागदपत्र
२७) सावकाश
२८) शरीर
३०) एकसारखे पाहणे
३२) हसणे
३४) एक व पाव शेर
३६) सापाची एक जात
३७) परका
३९) शेवटचा
४१) एक संख्या
४२) रानरेडा
४३) कृष्णा नदीवरील जलसंचयाचे नाव
४७) आश्चर्य
४८) हंगाम, विपुलता
४९) आकाश, अंतराळ
५०) धान्याचा ढिग
५१) लेखणी, बाब

### उभे संकेत

१) स्वच्छ चारित्र्याचा, बुद्धिवंत
२) साधु, ऋषी
३) उष्ण
४) सरस्वती
५) एक फुलझाड
६) सर्प ७) माती (हिं.)
८) कीर्ती, प्रसिद्धी
११) मुसलमानांचा एक सण
१३) चाल, रित
१५) सोय, प्रबंध
१६) पशू
१८) राग, आवेग
१९) मामल्याचा अधिकारी
२०) एक पालेभाजी
२१) त्रासलेला
२२) येणे
२३) लहान मुलांचा एक गोड खाऊ
२६) रुबाब, दिमाख
२७) मिनिस्टर
२९) आडव्या उभ्या रेषांचा स्तंभ
३१) राग, लोभ, मत्सर
३३) पयोदर
३४) सावित्रीचा पती
३५) नागाची एक जात, सापाचा राजा ३७) एक पक्षी
३८) बुड, खालचा भाग
३९) शाखा, शरीर
४०) एक कुंतीपुत्र
४१) एका वृक्षाचे नाव
४४) दादला
४५) गरीब, साधा
४६) दहाच्या ठिकाणचा
४८) ताकद, शक्ती

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सो | न | पि | त | ळ | | रो | ज | गा | र | | म | |
| न | | सु | | | ग | ज | | | ज | मा | न | त |
| ओ | ब | ड | धो | ब | ड | | अं | ज | नी | त | न | य |
| ळ | | णे | | बु | | व | त | न | | णे | | |
| ख | त | | मा | ल | क | स | | जा | ग | | शे | प |
| | र | म | न | | व | | ज | ग | न्ना | थ | पु | री |
| न | त | | सा | व | न | कु | मा | र | | र | | हा |
| ख | री | | ळ | | | ब | | | का | थ | | स |
| रा | त | | ले | क | चा | ल | ली | सा | स | र | ला | |
| | प | हि | ला | | रु | | | धा | रा | | ट | क |
| रा | णा | | | पा | गा | | आ | र | | भा | | र |
| जी | | ता | ड | प | त्री | | जा | ण | का | र | | त |
| व | र | ण | | ड | | हे | र | | ग | त | का | ळ |




१) खालीलपैकी सामान्यतः सुक्ष्मजीव कोणते असतात?
अ)एकपेशीय ब)हवेत आढळणारे
क)बहुपेशीय ड) अतिशुक्ष्म

२) कशाच्या अभावामुळे रक्तशय होतो?
अ)मॅग्नेशियम ब)प्रथिने क)कॅल्शियम ड) लोह

३) कशाचे भंजन करुन ऑईल गॅस मिळवतात?
अ)केरोसीन ब)दगडी कोळसा
क)फुएक गॅस ड) शुभ्र कोक

४) ग्रीन व्हॅट्रीऑल म्हणजे काय?
अ)चुनखडी ब)मोरचूद
क)हिराकस ड)चुनकडी

५) कांच ही खालीलप्रमाणे कशी आहे?
अ)दुर्वाहक ब)मंदवाहक
क)सुवाहक ड)संवाहक

६) पावसाळ्यात विजा चमकण्यामुळे कशाचे ऑक्सीडीकरण घडून येते?
अ)अमोनिया ब)नायट्रोजन
क)कार्बन ड)हायड्रोजन

७) सौर ऊर्जा कोणत्या स्वरुपात असते?
अ)गॅमा प्रारणे ब)प्रकाश प्रारणे
क)विद्युत चुंबकीय प्रारणे ड) अल्फा प्रारणे

८)गुरुत्वीय त्वरणाचे सर्वात जास्त मुल्य कोठे असते?
अ)ध्रुवांवर ब)महासागराजवळ
क)पृथ्वीच्या केंद्राच्या दिशेस ड) विषुववृत्तांवर

९) साबणांवर कोणत्या गोष्टीवर अनिष्ट परिणाम होतो?
अ)आम्लता ब)फ्लोरिन क)क्षारताड)सोडियम क्षार

१०) कोणता धातू कक्षा तापमानास द्रवरुप असतो?
अ)ग्रॅफाईटब)अल्कहोल क)पारा ड)ब्रोमीन

११) नेत्रभिंग आणि दृष्टिपटल यामधील अंतर कशाच्या आकारावर अवलंबून असते?
अ)नेत्रगोल ब)अंधबिंदू
क)बाहुली ड)पारपटल

१२) गतिमान पदार्थाच्या गतीला विरोध करणाऱ्या बलास काय म्हणतात?
अ) गतीय बल ब)विरोधी बल
क)त्वरण बल ड)घर्षण बल


**उत्तर: (१-अ), (२-ड), (३-अ), (४-क), (५-अ), (६-ब), (७-क), (८-अ), (९-अ), (१०-क), (११-अ), (१२-ड).**

| अविष्कार | संशोधक | वर्षे |
|---|---|---|
| विमान | -राईट ब्रदर्स | १९०३ |
| बायसिकल | -मॅकमिलन | १८४२ |
| घड्याळ | -ए.एल. बेलूएट | --- |
| रेडियम | - मॅडम क्युरी | --- |
| फाऊंटन पेन | - वायरमन | १८८४ |
| ग्रामोफोन | - एडीसन | १८७७ |
| टाईपरायईटर | -सी. सील्स | १८६८ |
| टेलिव्हिजन | -जे.एल. वेयर्ड | १९४९ |
| टेलिफोन | - ग्राहम वेल | १८७६ |
| परमाणु | - बॉंज आटोहान | १९४१ |
| रडार | -आर. डब्ल्यु. वॅरु | १९२२ |
| डाइनामो | -मायकेल फॅराडे | १८९१ |
| प्रिंटिंग प्रेस | -केक्सटन | १४५० |
| थर्मामिटर | - फॅरेनहाईट | १७१४ |
| एक्सरे | -डब्ल्यु के. रोटजन | १८९५ |
| कार | -कार्लबेज | १८८५ |
| डीझल इंजिन | -रुडाल्फ डिझल | १८९५ |
| रेल्वे इंजिन | -स्टीव्हन्सन | १८१४ |
| ट्रांजिस्टर | - डब्ल्यू. शाक्ले | १९५८ |
| स्कूटर | -जी. ब्रॉडशा | १९१९ |
| रणगाडा | -स्विन्टान | १९१४ |
| मायक्रोस्कोप | -झेड जान्सन | १५२० |
| रबर टायर | -डनलप | १८८८ |

### जनरल नॉलेज

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय युवा दिन | - | १२ जानेवारी |
| सेना दिवस | - | १५ जानेवारी |
| प्रजासत्ताक दिन | - | २६ जानेवारी |
| हुतात्मा दिन | - | ३० जानेवारी |
| केंद्रिय उत्पादन शुल्क दीवस | - | २४ फेब्रुवारी |
| राष्ट्रीय विज्ञान दिन | - | २८ फेब्रुवारी |
| भारतीय ऑर्डीनन्स फॅक्टरी दिवस | - | १८ मार्च |
| राष्ट्रीय सागरी दिन | - | ५ एप्रिल |
| महाराष्ट्र दिन | - | १ मे |
| राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस | - | ११ मे |
| राष्ट्रीय एकता दिन | - | १३ मे |
| दृष्टिदान दिन | - | १७ जून |
| भारत छोडो चळवळ वर्धापन दिन | - | ९ ऑगस्ट |
| स्वातंत्र्य दिन | - | १५ ऑगस्ट |
| राष्ट्रीय क्रीडा दिवस | - | २९ ऑगस्ट |
| राष्ट्रीय संस्कृत दिवस | - | श्रावण महि.पौर्णिमा |
| शिक्षकदिन,संस्कृत दिवस | - | ५ सप्टेंबर |
| हिंदी दिवस | - | १४ सप्टेंबर |
| हवाईदल दिन | - | ८ ऑक्टोंबर |
| टपाल दिन | - | ९ ऑक्टोंबर |
| पोलीस स्मृती दिन | - | २१ ऑक्टोंबर |
| राष्ट्रीय एकता दिन | - | ३१ ऑक्टोंबर |
| बालदिन | - | १४ नोव्हेंबर |
| राष्ट्रीय एपिलप्सी दिवस | - | १७ नोंव्हेंबर |
| नौदल दिन | - | ४ डिसेंबर |
| ध्वज दिन | - | ७ डिसेंबर |
| राष्ट्रीय उर्जा संवर्धन दिवस | - | १४ डिसेंबर |
| अल्पसंख्यांक हक्क दिवस | - | १८ डिसेंबर |
| किसान दिन | - | २३ डिसेंबर |
| ग्राहक संरक्षक दिन | - | २४ डिसेंबर |
| वन्यजीव सप्ताह | - | १ ते ७ अक्टोंबर |
| राष्ट्रीय पर्यावरण जागृती महिना | - | १९ नाव्हेंबर ते १८ डिसें. |

## फिल्मी शब्दकोडे



### आडवे संकेत

१) सन् १९८४ में पापी पेट का सवाल है इस फिल्म के संगीतकार.
४) xxx कृष्णमूर्ती (गायीका)
७) सन् २००२ में बनी गोविंदा, जॉनी लिव्हर और चंद्रचुड सिंह की एक फिल्म.
९) सन् १९७४ में नरेंद्र बेदी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और मौसमी चटर्जी थे.
११) सन् १९९३ में बनी ऋषी कपूर, मिनाक्षी शेषांद्री और सनी देओल की एक फिल्म.
१३) कोतवाल xx (फिल्म)
१४) करण अर्जून इस फिल्म में लिंगया यह नाम किस अभिनेता का था.
१५) सन् १९९९ में लतिफ बिन्नी निर्देशित इस फिल्म में अक्षय खन्ना और सोनाली बेंद्रे थे.
१७) सन् १९८४ में यश चोपडा निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, मिनाक्षी शेषांद्री, अनिल कपूर, राजेश खन्ना थे.
१८) सन् १९८८ में जलाल आगा निर्देशित इस फिल्म में बिंजू अली और जुही चावला थे.
२०) शेष xx (फिल्म)
२१) सन् १९९३ में सुभाष घई निर्देशित इस फिल्म में संजय दत्त, जैकी श्रॉफ, माधूरी दीक्षीत थे.
२३) सन् १९९६ में अशोक होंडा निर्देशित इस फिल्म में सुनील शेट्टी और करिश्मा कपूर थे.
२५) xxx सफाई (फिल्म)
२६) xxx मत ले यार (फिल्म)
२७) मोहसीन खान, आदित्य पांचोली और वर्षा उसगावकर अभिनीत एक फिल्म.
२८) अक्षय कुमार प्रियंका चोपडा और लारा दत्ता अभिनीत एक

### उभे संकेत

२) सन् २००३ में हैरी बावेजा निर्देशित इस फिल्म में अजय देवगन, नेहा धुपिया और सुनील शेट्टी थे.
३) सन् १९७२ में नरेंद्र बेदी निर्देशित इस फिल्म में रणधीर कपूर और जया भादूरी थे.
५) सन् १९९४ में बनी तेजस्विनी इस फिल्म की नायीका.
६) बॉम्बे टु गोवा इस फिल्म की नायीका. ८) सन् १९९५ में राज एन. सिप्पी निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रेखा थे.
९) सन् १९८३ में राहुल रवैल निर्देशित इस फिल्म में सनी देओल और अमृता सिंह थे.
१०) आफताब शिवदासानी और उर्मिला मातोंडकर की एक फिल्म.
११) सन् १९९९ में राज कंवर निर्देशित इस फिल्म में चंद्रचुड सिंह, महिमा चौधरी और संजय दत्त थे.
१२) इस फिल्म में परेश रावल का नाम वेलजी भाई था.
१४) सन् १९६८ में बनी हमसाया इस फिल्म के निर्देशक.
१६) सन् १९९८ में प्रियदर्शन निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर, पुजा भट्ट और जैकी श्रॉफ थे.
१७) सन् १९९४ में फरोग सिद्दीकी निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और तब्बु थे.
१९) सन् १९८४ में कै. बापय्या निर्देशित इस फिल्म में राजेश खन्ना और श्रीदेवी थे. २२) सन् १९९५ में महेश भट्ट निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और जुही चावला थे.
२४) xx तेरा देवर दिवाना हाय राम कुडीयों को डाले दाना.....
२५) xx मेरे साथी (फिल्म)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हा | दे | व | न | | भु | पे | न | | ज | मि | न |
| ना | | वे | | | | पें | | या | | ति | | वि |
| | व | न | | जि | तें | द्र | | दि | वा | न | प | न |
| | | व | | | | | डॉ | न | | | ल | |
| | व | र्मा | म | ली | क | | | | खौ | | | |
| | जु | | ह | | री | मा | | आ | फ | ता | ब | |
| | द | ला | ल | | ना | | | प | | | | स |
| शा | | ल | | ए | क | दु | जे | के | लि | ए | | ड |
| ह | | दु | र | | पू | | बा | | | त | क्ष | क |
| रु | | प | ती | | र | | | अ | जु | बा | | छा |
| ख | | ट्टा | | फ | | जी | ग | र | | र | | प |
| खा | | | गु | रु | दे | व | | मा | | | जि | |
| न | ग | मा | | ख | | न | | न | सी | रु | द्दी | न |

### विनोद

एक इसम-तुझे वडील घरी आहेत का?
मुलगा-होय।
इसम-मी त्यांना आता भेटू शकतो का?
मुलगा-'का नाही। ते आताच ऑफिसातून घरी आले आहेत. आणि बूटही काढले असतील।'

---

'मोहन, हे पाकीट घेऊन पोस्टात जा. बरोबर पैसे घे यावर तिकीट लावावे लागेल.
पोस्टमास्तर जेवढे तिकीट लावायला सांगतील तेवढे लाव.'
मोहन पोस्टात गेला. पोस्टमास्तरने पाकीटाचे वजन केले व सांगितले, 'यावर एक रुपयाचे तिकीट लाव,'
मोहन-'साहेब, तर मग तिकीट लावल्याने आणखीण वजन वाढणार। पुन्हा तुम्ही सांगाल की तिकीट लावावे लागेल।'

### चारोळी

'ते' दुःख 'तू' विसर
हेच तुझं मागणं आहे
काळाच्या 'त्या' जखमांसहच
आता जीवन जगणं आहे.

# पोस्टल कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा संघर्ष अटळ; न्याय्य मागण्यांसाठी करण्यात आली राज्यभर निदर्शने

## अहिल्यानगर, पुणे, सोलापूर व लातूर येथे विभागीय सचिव कॉ. अजित झगडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला प्रतिसाद



अखिल भारतीय आरएमएस व एमएमएस कर्मचारी संघटना (ग्रुप 'सी') व एनएफपीईच्या संयुक्त आवाहनानुसार पोस्टल कर्मचाऱ्यांच्या विविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी नुकतेच देशभर दुपारच्या सुट्टीत निदर्शने करण्यात आली.

नगर – अखिल भारतीय आरएमएस व एमएमएस कर्मचारी संघटना (ग्रुप 'सी') व एनएफपीईच्या संयुक्त आवाहनानुसार पोस्टल कर्मचाऱ्यांच्या विविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी नुकतेच देशभर दुपारच्या सुट्टीत निदर्शने करण्यात आली. संघटनेचे जनरल सेक्रेटरी कॉ. प्रदीप खडसे यांच्या नेतृत्वाखाली देशभर आंदोलन पार पडले, तर महाराष्ट्रात सर्कल सचिव कॉ. अरविंद शिवतरे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, सोलापूर व लातूर या चार विभागांमध्ये विभागीय सचिव कॉ. अजित झगडे यांच्या नेतृत्वाखाली पोस्टल कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवत निदर्शने केली. यावेळी कॉ. झगडे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत पोस्टल कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांकडे केंद्र सरकार व पोस्टल प्रशासनाने तातडीने सकारात्मक दृष्टीने लक्ष देण्याची आवश्यकता असून, यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

निदर्शनांमध्ये जुनी पेन्शन योजना (OPS) तात्काळ लागू करणे, आठव्या वेतन आयोगाची त्वरित अंमलबजावणी करणे, १ जानेवारी २०२६ पासून ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करून अंतरिम आर्थिक दिलासा देणे, ग्रामीण डाक सेवक (GDS) कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगात समाविष्ट करणे, पोस्टल विभागातील रिक्त पदे तातडीने भरणे तसेच आरएमएस कार्यालये व सेक्शन बंद करण्याचे धोरण त्वरित रद्द करणे आदी प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष कॉ. उमाकांत वालगुडे, कॉ. राजू मगर, कॉ. रवींद्र काशीद, कॉ. लक्ष्मण हुंबे, कॉ. राजेंद्र चव्हाण, कॉ. अशोक दळवे, कॉ. महादेव निंबाळ, कॉ. बाबासाहेब बोरुडे, कॉ. विठ्ठल आबनावे, कॉ. कैलास उंबरकर, कॉ. सचिन गाडेकर, कॉ. विक्रम परदेशी, कॉ. दत्ता व्हटे, कॉ. आयुब शेख, कॉ. तुषार टाक, कॉ. निलेश झांबरे, कॉ. महेश काळे, कॉ. श्रीकांत पाटील, कॉ. सागर काळभोर, कॉ. दिप्ती कंगे, कॉ. अश्विनी घोरपडे, कॉ. शानम कोरे आणि कॉ. सोमिनाथ गांजुरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व पोस्टल कर्मचारी उपस्थित होते.

या आंदोलनामुळे पोस्टल कर्मचाऱ्यांमध्ये मोठी एकजूट दिसून आली. पोस्टल कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत केंद्र सरकार व पोस्टल प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच, मागण्यांवर लवकरात लवकर समाधानकारक निर्णय न झाल्यास संघटना राज्यभर आणि देशभर पुढील आंदोलन अधिक व्यापक, संघटित व प्रभावी स्वरूपात उभारेल, असा इशाराही विभागीय सचिव कॉ. झगडे यांनी यावेळी दिला.



अरणगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नम्रता कांबळे यांची निवड झाल्याबद्दल जल्लोष करताना कार्यकर्ते.

# अरणगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नम्रता कांबळे

नगर – अरणगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नम्रता दिगूभाऊ कांबळे यांची निवड झाली. दिगू कांबळे यांचे मोठे बंधू राहुल कांबळे (माया) यांची भूमिका या निवडीमध्ये महत्त्वाची ठरली.

गावातील विद्यमान सरपंच पोपट पुंड, उपसरपंच विठ्ठल दळवी, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे पदाधिकारी, विविध समाजघटकांतील मान्यवर तसेच युवकांच्या सहकार्याने गावाच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

उपसरपंच निवडीनंतर झालेल्या सत्कार सोहळ्यास प्रवीण चाबुकस्वार, दिलीप कांबळे, इकेश कांबळे, माजी उपसरपंच संपत कांबळे, मोहिनीताई जाधव, प्रतिभाताई थोरात, स्वातीताई शिंदे, नंदाताई करांडे, ग्रामपंचायत सदस्य अंजुम सय्यद, मारुती आमले, तसेच मयूर जगताप, ईश्वर फसले, बापू शिंदे, अर्जुन पुंड, साहिल गायकवाड, किरण कांबळे, मंगेश भिंगारदिवे, ऋतिक कांबळे, सागर भांबळ, शंकर सूर्यवंशी, मेहेर राजू, योगेश कांबळे, सुमित माळवे, आदेश कांबळे, श्रीकांत रोहकले, शाक्य कांबळे, सुरज कांबळे, स्यामी देठे, सिमी कांबळे, समर्थ कांबळे, संग्राम कांबळे, सुदाम साळवे, राजू पवार, प्रेम गौतम कांबळे, सतीश जयदेव कांबळे, पियुष कांबळे, अश्विन कांबळे, संदेश साळवे, आकाश साळवे, किशोर शिंदे, शेखर साळवे, सागर जावळे, मेहेर कांबळे, वीर जाधव, संग्राम कांबळे, राज भिंगारदिवे, आरपीआयचे महेंद्र कांबळे (अंकल) यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सुगंधी तंबाखू आणि मावा विक्रीवर नगर शहरात पोलिसांची कारवाई

## पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर –मानवी जीवितास अपायकारक असणाऱ्या आणि महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखू तसेच सुपारी मिश्रित माव्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कोतवाली पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील माळीवाडा परिसरातील कपिलेश्वर पान शॉपसमोरील पत्र्याच्या शेडजवळ आणि डागवाले पान शॉप येथे १५ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.यावेळी पोलिसांनी ८,३१० रुपयांची सुगंधी सुपारी व रोख रक्कम जप्त केली आहे.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्याचे पो. कॉ. सत्यजित शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. अन्न सुरक्षा आयुक्त व अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये राज्यात मानवी शरीरास अपायकारक असणाऱ्या सुगंधी तंबाखू, सुपारी व मावा तयार करण्यास आणि विक्री करण्यास कायदेशीर बंदी आहे. ही माहिती असतानाही आरोपी सचिन सुधाकर ससाणे (वय ३२, रा. माळीवाडा, आण्णाभाऊ साठे वसाहत, अहिल्यानगर) आणि विजय सिंग सुरजभानसिंग (वय २७, मूळ रा. सेमराईज, उत्तर प्रदेश, हल्ली रा. टिळक रोड, अहिल्यानगर) हे इतर आरोपींच्या सांगण्यावरून प्रतिबंधित मावा विक्रीसाठी स्वतःच्या कब्जात बाळगताना रंगेहात मिळून आले.

या गुन्ह्यात कैलास बबनराव मोकाटे, केशव पांडुरंग मोकाटे (दोघे रा. माळीवाडा) आणि सुभाष डागवाले (रा. भोपळेगल्ली, माळीवाडा) या इतर आरोपींचाही समावेश असून ते सध्या फरार आहेत. पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ सह अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे कलम २६ (१), २६ (२), (१), खख, खत प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मेढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# पान दुकानदारांचा आझाद मैदानावर विविध मागण्यांसाठी मोर्चा



नगर – महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने पान दुकानदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १४ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी धडक मोर्चा व धरणे आंदोलन पार पडले. राज्यभरातील हजारो पान दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवून या आंदोलनात सहभाग घेतला.

अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांचा निषेध करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनानंतर महासंघाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवळ यांची मंत्रालयात भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री नरहरी झिरवळ यांनी पान दुकानदारांच्या मागण्या गांभीर्याने विचारात घेतल्या जातील तसेच संबंधित विभागाशी चर्चा करून लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. पान दुकानदारांना न्याय मिळेल, अशी सकारात्मक भूमिका त्यांनी व्यक्त केल्याची माहिती महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

या आंदोलनात मोक्का कायद्याचा चुकीचा वापर थांबविणे, अन्न व औषध प्रशासनाकडून होणाऱ्या अन्यायकारक कारवाया रोखणे, सुगंधी तंबाखूवरील बंदीचा पुनर्विचार करणे, पान शॉप व्यावसायिकांना आर्थिक मदत, अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून देणे, पान व्यवसायाच्या विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करणे आदी प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी, कार्याध्यक्ष शरद मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, लातूर जिल्हाध्यक्ष मसूद काझी, सांगली जिल्हाध्यक्ष रत्नाकर नांगरे, दिनेश बरंवाल, अजिंक्य पाटील यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी केले.

महासंघाच्या वतीने या आंदोलनाला महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद मिळाल्याचा दावा करण्यात आला असून, पान दुकानदारांच्या न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत संघटनेचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# 'एसआयआर पुनरीक्षणाला' ४५ दिवसांची मुदतवाढ द्यावी; निवडणूक आयोगाकडे मागणी

नगर – राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेली विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) प्रक्रिया अद्याप पूर्णत्वास गेलेली नसल्याने या प्रक्रियेस किमान ४५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पीस फाऊंडेशनसह विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठविण्यात आले आहे.

सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने १५ जुलै रोजी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रक्रियेत नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट अर्शद शेख, भारतीय जनसंसदचे अशोक सब्बन, बबलू खोसला, विजय शिरसाठ, ॲड. विद्या शिंदे, एम. इकबाल, पीपल्स हेल्पलाईनचे वीरबहादूर प्रजापती, रईस शेख, इम्तीयाज शेख, मोहसीन सय्यद, अलफैज सय्यद, अन्सार सय्यद आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, भारतीय लोकशाहीची खरी ताकद मुक्त, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक निवडणूक प्रक्रियेत आहे. मतदार यादी ही या प्रक्रियेचा पाया असून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव त्यात समाविष्ट असणे अत्यंत आवश्यक आहे. जर एखाद्या पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले गेले किंवा त्रुटी राहिल्या, तर त्याच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकारावर थेट परिणाम होऊ शकतो.

सध्या मतदार पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान अनेक नागरिकांना आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, त्यांची पडताळणी करून वेळेत अर्ज सादर करणे यात मोठ्या अडचणी येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, स्थलांतरित कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळेची गरज आहे. अनेक ठिकाणी जनजागृतीचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय विलंब यामुळे पात्र मतदारांना आवश्यक कार्यवाही पूर्ण करणे कठीण जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**पावसाळा, कागदपत्रांची अडचण आणि अपूर्ण प्रक्रिया; मतदार यादी पुनरीक्षणासाठी अतिरिक्त मुदतीची गरज**



'एसआयआर पुनरीक्षणाला' ४५ दिवसांची मुदतवाढ देण्याचे मागणीचे निवेदन विविध सामाजिक संघटनांच्यावतीने निवडणूक आयोगाला देण्यात आले.

याशिवाय सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यामुळे अनेक भागांत अतिवृष्टी, पूरस्थिती, वाहतूक व दळणवळणात अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी नागरिकांसह निवडणूक यंत्रणेलाही पुनरीक्षण प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यात अडचणी येत आहेत.

सामाजिक संघटनांनी निवेदनात असा दावाही केला आहे की, पुनरीक्षण प्रक्रियेच्या समाप्तीस अवघे १४ दिवस शिल्लक असताना अद्याप ५० टयांपेक्षाही कमी काम पूर्ण झाले आहे. अशा परिस्थितीत उर्वरित प्रक्रिया घाईघाईने पूर्ण करण्याचा प्रयत्न झाल्यास अनेक पात्र नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची किंवा आवश्यक पडताळणी अपुरी राहण्याची गंभीर शक्यता आहे.

मतदानाचा अधिकार हा भारतीय लोकशाहीतील सर्वात महत्त्वाच्या घटनात्मक अधिकारांपैकी एक आहे. वेळेअभावी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे एकाही पात्र नागरिकाला मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागू नये. विशेष सघन पुनरीक्षणाचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक, सर्वसमावेशक आणि विश्वासार्ह बनविण्याचा असला तरी अपुऱ्या कालावधीत प्रक्रिया पूर्ण केल्यास हा उद्देशच धोक्यात येऊ शकतो.


निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, अपूर्ण किंवा त्रुटीपूर्ण पुनरीक्षणामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर हरकती, दावे, अपील आणि न्यायालयीन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणूक यंत्रणा तसेच न्यायव्यवस्थेवर अनावश्यक ताण येईल. त्यापेक्षा सध्या पुरेसा वेळ देऊन काटेकोर पडताळणी करणे अधिक परिणामकारक आणि जनहिताचे ठरेल.

पीस फाऊंडेशनसह सामाजिक संघटनांनी निवेदनात ४५ दिवसांची अतिरिक्त मुदत दिल्यास पुढील महत्त्वाचे फायदे होतील, असे स्पष्ट केले आहे. सर्व पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल, पात्र मतदारांची नावे चुकीने वगळली जाण्याची शक्यता कमी होईल, ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांचा सहभाग वाढेल, मतदानाच्या घटनात्मक अधिकाराचे प्रभावी संरक्षण होईल, मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनेल, निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, हरकती, दावे, अपील आणि न्यायालयीन वादांची संख्या कमी होईल.

पीस फाऊंडेशनसह सामाजिक संघटनांनी भारतीय राज्यघटनेतील लोकशाही, समानता आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकार या मूलभूत तत्त्वांचे संरक्षण करण्यासाठी विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेस किमान ४५ दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. कोणताही पात्र नागरिक केवळ वेळेअभावी किंवा प्रक्रियात्मक अडचणींमुळे मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, हीच या मागणीमागील प्रमुख भावना असल्याचे सामाजिक संघटनांनी स्पष्ट केले आहे.

# चुका कर्मचाऱ्यांच्या नुकसान सामान्य जनतेचे हा कोणता न्याय?

## जन्म मृत्यू कार्यालयातील दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी : परवेज अशरफी



नगर – महाराष्ट्र सरकारने सर्व कार्यालयाला आदेश दिले होते की कार्यालयाचे सर्व रेकॉर्ड संग्रकीत करून घ्यावे. याच अनुषंगाने अहमदनगर नगरपालीका असतांना पालिकेला जन्म मृत्यू नोंदणी रेकॉर्ड संग्रकीत करने आवशक होते. परंतु ३०–३५ वर्ष होऊन देखील नगरपालीका असतांना किंवा महानगर पालिका झाल्यावर जन्म मृत्यू नोंद रेकॉर्ड संग्रकीत करण्यात आलेले नाही असा आरोप एम आय एम जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी केला.

जिल्हाधिकारी यांना एमआयएम तर्फे निवेदनात असे नमूद आहे की, सध्या एस आय आर मुळे बहुतांश नागरिक स्वताचे किंवा नातेवाईकांचे जन्म मृत्यू दाखले काढण्यासाठी महानगरपालिकेतील जन्म मृत्यू कार्यालयात अर्ज करत आहे. पालिकेतील जन्म मृत्यू नोंदवही हातात घेताच पानाचे तुकडे हातात येऊ राहीले, तसेच काही पान गहाळ झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. तर काही पान सापडत नाही. त्यामुळे जुनी नोंद सापडणे शक्य होत नाही. जन्म मृत्यू नोंदवही पाहिल्यास आपल्या निदर्शनास येईल की पालिकेने संगणकीय करण्याचे आदेशाला केराची टोपलीत टाकून सामान्य नागरिकांचा किती मोठे नुकसान केले आहे.

डॉ. परवेज अशरफी यांनी सांगितले की महापालिकेच्या भोंगळ कारभारामुळे सामान्य जनतेचे नागरिकत्व धोक्यात आले आहे. याला जबाबदार कोण ?., पालिकेतील कर्मचारी नोंद सापडत नसल्याने तहसील कार्यालय किंवा न्यायालयातून आदेश आणावे असे उत्तर नागरिकांना देतात., चूक पालीकेची आणि मानसीक तान, आर्थिक नुकसान नागरिकांचे का ?

डॉ. परवेज अशरफी पुढे असे म्हणाले की पालिका हद्दीत दुरुस्तीच्या नावावर १८००० जन्म दाखले दिले असल्याची जिल्हा अधिकारी चौकशी करणार आहे त्या सोबत पालीकेने इतक्या वर्षात जन्म मृत्यू नोंदवही संग्रकीत करून का घेतली नाही याचे मागचे कारण आणि याला जबाबदार व्यक्तींना दोषी धरून त्यांच्यावर कारवाही होणे गरजेचे असुन, जिल्हाधिकारी याच्यावर काय निर्णय घेतात तो निर्णय नागरिकांच्या फायद्याचा असेल की कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे असे डॉ. परवेज अशरफी यांनी निदर्शनास आणून दिले.

# आनंदऋषीजी योगा सेंटर


## आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी बापुसाहेब विठ्ठल डावरे १ जानेवारी २०२६ पासून जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी योगा सेंटर आयोजित योग वर्गाला नियमित येत आहे. योग गुरु अनिल मेहेर यांचे मार्गदर्शन अतिशय उत्कृष्ट आणि दिशादर्शक आहे. ते प्रत्येक योगासन आणि प्राणायाम खूप सोप्या पद्धतीने आणि सहजतेने करुन घेतात.

माझा अभिप्राय असा आहे की, मी मुकबधिर विद्यालय सावेडी, अहिल्यानगर येथे नोकरीस असुन शाळेच्या वेळेत बसुन कामकाज असल्यामुळे दिवसभर थकल्यासारखे वाटायचे संध्याकाळी जेवणानंतर जास्त थकवा येत होता व वजनही वाढत होते. पण योगा क्लासमुळे माझ्या आरोग्यात खूप चांगली सुधारणा झाली आहे. मला दिवसभर अत्यंत फ्रेश, उत्साही आणि सकारात्मक वाटते. संध्याकाळी आजिबात थकवा येत नाही. योग गुरु हे आत्यंत चांगले मार्गदर्शन करत आहेत व वर्ग चालु असतांना सकारात्मक मार्गदर्शन केले जाते त्यामुळे नकारात्मकता कमी होऊन आत्मविश्वास वाढला आहे. योग्य मार्गदर्शनामुळे स्वतःच्या क्षमतेवचा विश्वास आला आहे.

या योगा क्लासचे सर्वात चांगले वैशिष्ट्य म्हणजे येथे योगा बरोबर सर्व साधकांचा वाढदिवस/लग्नाचा वाढदिवस हा एकत्र साजरा केला जातो. यामुळे क्लासमध्ये एका कुटुंबासारखे जिव्हाळ्याचे आणि आनंदी वातावरण तयार झाले आहे. शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आनंद देणारा हा उपक्रम राबवल्याबद्दल योग गुरु आदरणीय श्री. अनिलजी मेहेर सरांचे मनःपूर्वक आभार!

'हेल्थ इज वेल्थ' हा उपक्रम हा खरोखरच अत्यंत स्तुत्य आणि आजच्या युगात अत्यंत फायदेशीर असा उपक्रम आहे. पहिले सुख निरोगी शरीर या म्हणीप्रमाणे निरोगी आरोग्य हीच आपल्या जीवनातील सर्वात मोठी संपत्ती आहे. हा उपक्रम सुरू केल्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन!



– **बापुसाहेब डावरे,** अंबिकानगर, केडगांव (देवी) ता.जिल्हा अहिल्यानगर

# अभियांत्रिकी पदवी परीक्षेत संस्कृती सहदेवची उत्तुंग भरारी



नगर – येथील संस्कृती विनोद सहदेव हिने बी.ई. (कॉम्प्युटर सायन्स) च्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत ९०.०३ टक्के गुण मिळवून उज्वल यश संपादन करून संगणक अभियांत्रिकीची पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली. संस्कृती ही ओमप्रकाश भरतकुमार सहदेव यांची नात आहे.

# धनादेश अनादर न वटल्याप्रकरणी जामिनदाराला एक वर्ष कारावास

## ६६.२१ लाख रूपये भरपाईचा आदेश

नगर – भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., केडगाव यांच्या थकीत कर्ज वसुली प्रकरणात धनादेश अनादर (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट, कलम १३८) प्रकरणी न्यायालयाने जामिनदार अभिजीत जयवंत आदि (रा. पर्वती टॉवर्स, सावेडी, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) यांना एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा तसेच एकूण ₹६६,२१,४२४ इतकी रक्कम तक्रारदार संस्थेला अदा करण्याचा आदेश दिला आहे.

भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, केडगाव येथील थकीत कर्जदार सौ. शमा अभिजीत आदि यांच्या कर्ज वसुलीसाठी जामिनदार अभिजीत जयवंत आदि यांनी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा केडगाव येथील क्रमांक ६६०४५८ चा ₹३२,२९,९६३ रकमेचा धनादेश संस्थेकडे १९ ऑक्टोबर २०१४ रोजी दिला होता. मात्र, संबंधित धनादेश बँकेत सादर केल्यानंतर Funds Insufficient (खात्यात अपुरी शिल्लक) या कारणास्तव तो अनादरित होऊन परत आला. त्यानंतर संस्थेने ३ डिसेंबर २०१४ रोजी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत अहिल्यानगर न्यायालयात दावा दाखल केला. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने १४ जुलै २०२६ रोजी निकाल देत आरोपी अभिजीत जयवंत आदि यांना एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच मूळ धनादेशाची रक्कम व त्यावर दरमहा ९ टक्के दराने ११ वर्षे ८ महिन्यांचे व्याज धरून एकूण ₹६६,२१,४२४ इतकी रक्कम तक्रारदार संस्थेला अदा करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात संस्थेच्या वतीने वसुली अधिकारी भास्कर शिवाजी सोनवणे यांनी फिर्यादी म्हणून कामकाज पाहिले. संस्थेच्या बाजूने ॲड. सतीश उदास व ॲड. तेजस उदास यांनी न्यायालयीन कामकाज हाताळले, तर आरोपीच्या वतीने ॲड. एस. एस. गुगळे यांनी बाजू मांडली.

